A Warranty For Golden Career

# राजमुद्रा अकॅडमी,लातूर

## C-SAT पेपर क्र. 2 घटक

# निर्णय क्षमता (Decision Making)

## 2013 ते 2023 पर्यंत आयोगाने विचारलेले प्रश्न


## संकलन : प्रा.धोंडीराम भिंगोले


- 2013 पासुन MPSC ने C-SAT (Civil Service Aptitutde Test) पेपर क्रमांक 2 मध्ये निर्णय क्षमता हा घटक समाविष्ट करण्यात आला आहे.
- C-SAT हा पेपर 80 प्रश्नांचा असुन त्यातील प्रत्येक प्रश्न 2.5 गुणांसाठी विचारण्यात येतो
- 80 प्रश्नांपैकी - 50 गुण उताऱ्यावरील प्रश्न असतात, त्यात 10 उतारे असतात.

  25 प्रश्न - गणित व बुद्धीमत्ता या घटकावरचे आहेत तर

  05 प्रश्न - निर्णय क्षमता या घटकाचे आहेत.
- हे 05 प्रश्न बहुधा प्रश्न क्र. 76 ते 80 दरम्यान विचारण्यात येतात आणि या प्रश्नासाठी चुकीच्या उत्तरासाठी गुण वजा होत नाहीत.
- हे प्रश्न सोडवताना पुढील बाबी लक्षात ठेवा.

1) दिलेल्या प्रश्नामध्ये योग्य व आदर्श उत्तराची अपेक्षा असते.
2) दिलेल्या पर्यायातुन वाईट निर्णय व चांगला निर्णय यात फरक करणे.
3) दिलेल्या चार पर्यायापैकी दोन वाईट पर्याय वगळणे.
4) दोन चांगल्या पर्यायापैकी आदर्श पर्याय निवडणे.
5) एका अधिकाऱ्याचे किंवा आदर्शव्यक्तीचे/नागरिक वर्तन विशिष्ट दिलेल्या परिस्थितीत कसे असावे याचा विचार करावा.
6) कायदेशिदृष्ट्या व शासनदृष्ट्या योग्य आदर्श निर्णय निवडावा.
7) परिक्षार्थींची कसोटी पाहणे हा आयोगाचा उद्देश असतो.
8) निर्णय क्षमता, मूल्य, इत्यादी गोष्टी तपासणे हा उद्देश असतो.
9) प्रत्येक प्रश्नासाठी स्वतंत्र विचार करणे गरजेचे आहे.
10) प्रश्नाचे उत्तर सोडवताना आपल्या आजुबाजुला ती परिस्थिती आहे किंवा तुम्ही स्वत: अधिकारी आहेत किंवा जी परिस्थिती दिली आहे तशी कल्पना करुन उत्तर देण्याचा प्रयत्न करा.

**76.** अधिकाऱ्यांनी निश्चित केलेल्या नियमांनुसार कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थानाचे वाटप करणाऱ्या विभागाचे प्रमुख म्हणून तुम्ही काम करत आहात. एका गटाने, तुमचा कार्य अहवाल तयार करणाऱ्या वरिष्ठाकडे, विशिष्ट व्यक्तीला ते रहात असलेल्या इमारतीत, ती आरक्षित गटातील असल्यामुळे रहाण्यासाठी जागा देऊ नये अशी विनंती केली आहे. अप्रत्यक्षपणे तुमच्या वरिष्ठाने तुम्हाला त्यांची विनंती मान्य करण्याची सूचना केली आहे. मात्र संबंधित निर्णयाच्या परिणामाला पूर्णपणे तुम्हीच जबाबदार असाल असा इशाराही दिला आहे. पुढच्या काही महिन्यांत तुमची बढती अपेक्षित आहे. दिलेल्या परिस्थितीत दिलेल्या कृती पर्यायांतून तुमची निवड कोणती असेल ?

(1) पुढील काही महिन्यातच तुम्हाला बढती अपेक्षित असल्यामुळे वरिष्ठाच्या सूचनेचा स्वीकार करण्यापलीकडे तुमच्याकडे अन्य पर्याय उरलेला नाही.

(2) नियमांनुसार संबंधित कर्माचाऱ्याला जागेचे वाटप करून तुम्ही कोणत्या परिस्थितीत वाटपाचा निर्णय घेतला आहे याबाबत त्याला किंवा तिला सावध कराल.

(3) संबंधित कर्मचाऱ्याला परिस्थिती सांगून तुम्हाला बढती मिळेपर्यंत त्याला वा तिला थांबण्याची विनंती कराल.

(4) कोणताही निर्णय न घेता व्यक्तीला काही जास्तीचा काळ वाट पाहण्याची विनंती करत रहाल.

**77.** जिल्ह्यातील पारितोषिकासाठी अंतिम फेरीत निवडलेल्या अध्यापकांच्या मुलाखतींसाठी गठीत केलेल्या समितीचे शिक्षण अधिकारी म्हणून तुम्ही सदस्य आहात. अध्यापन अध्ययन प्रक्रिया व तिची अध्ययनार्थींच्या व्यक्तिगत व सामाजिक विकासावर झालेल्या परिणामासंबंधीच्या अध्यापकांच्या दस्तावेजाचे तुम्ही विश्लेषण करत आहात. या दस्तावेजांतून जाताना तुम्ही त्यांच्या कामासंबंधीचा शोध घेणारे प्रश्न रचत आहात. तंत्रज्ञानाचे आकलन असलेल्या व्यक्तीची जड दुमड पाहत असताना तुम्हाला अध्यापन अध्ययन प्रक्रिया व संबंधित अध्ययनार्थी गटावर झालेल्या परिणामाचे एकही दस्तावेजीकरण सापडले नाही. उदाहरणार्थ, Daffodils ही कविता शिकण्यासाठी त्या अध्यापकाने ई-स्वयंअध्ययन साहित्य विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोहोचवले याविषयी लिहिले आहे. तुम्ही त्याला प्रश्न कराल...

(1) कोणते प्रयोजन समोर ठेवून तुम्ही ई-स्वयंअध्ययन साहित्य रचले आणि या अध्ययनाच्या निष्पत्तीची चाचणी तुम्ही कशी घेतली ?

(2) तुमच्या शालेय व महाविद्यालयीन शिक्षणादरम्यान तुम्ही अनेक कविता शिकला असाल. तुमच्या व्यक्तिगत आणि व्यवसायिक जीवनात या कविता अध्ययनाने कोणते प्रयोजन साध्य झाले ?

(3) वाचन व श्रवण यांच्या व्यतिरिक्त अध्ययनार्थींना त्यांचे अध्ययन प्रकट करायला लावणाऱ्या कोणत्या अन्य कृती वा अनुभव तुम्ही रचले ?

(4) या कवितेचा अध्ययनार्थींवर झालेल्या परिणामाचे परीक्षण करण्यासाठी तुम्ही कोणत्या कृती रचल्या ?

**78.** राज्य सरकारच्या नियामक विभागाकडून परवान्याची गरज असलेल्या तुम्ही नवा व्यवसाय सुरू करण्याची जोखीम घेऊन त्या दिशेने प्रयत्नशील आहात. त्यासाठी सर्व प्रक्रियात्मक औपचारिकता पूर्ण करून आणि आवश्यक त्या कागदपत्रांसह तुम्ही अर्ज दाखल केला आहे. अर्ज सादर करून महिने लोटले तरीही परवाना तुमच्या हाती आलेला नाही. या विलंबामुळे व्यावसायिक संधीचे होणारे नुकसान हे या विभागातील परवाना देणाऱ्या व्यक्तींच्या साखळीकडून मागणी केलेल्या रकमेपेक्षा कमी आहे. हा प्रश्न निकाली काढण्यासाठी दिलेल्यापैकी कोणत्या पर्यायाची तुम्ही निवड कराल ?

(1) कदाचित कोणत्याही अवैध बक्षिसाची अपेक्षा करणार नाही अशी आशा बाळगून, संयमाने विभागातील कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याची लवकरात लवकर परवाना देण्यासाठी मनधरणी कराल.

(2) व्यवसायासाठीची गुंतवणूक म्हणून वेळ वाया न घालवता व्यवसाय सुरू करण्यासाठी मागणी केलेली रक्कम द्याल.

(3) परवान्याचा प्रश्न लाच न देता सोडवण्यासाठी तुमचे राजकीय कार्यकर्त्यांशी असलेले संपर्क वापराल.

(4) अशा प्रकारचा परवाना देण्यासाठी साधारणपणे किती कालखंड घेतला जातो याची माहिती मिळवण्यासाठी एखाद्या माहिती अधिकार कार्यकर्त्याशी संपर्क साधाल.

**79.** तुमचा एक सहकारी एका प्रकल्पाचा प्रमुख म्हणून काम पाहत होता. काही दुखण्यामुळे त्याला किमान पुढचे दोन महिने तरी हे काम करणे शक्य होणार नाही. विभागाच्या प्रशासकीय प्रमुखाने तुमच्या सध्याच्या कामाबरोबरीने या प्रकल्पाचे प्रमुख म्हणून जादा काम करावे अशी तुम्हाला विनंती केली आहे. तुमचे काम तसेच हा प्रकल्प तुम्ही मर्यादित वेळेत पूर्ण करावा अशी अपेक्षा असल्याने तुम्हाला त्यात जास्तीचा वेळ आणि शक्ती गुंतवावी लागेल. पुढे दिलेल्या पर्यायांतील तुमचा यासाठीचा प्रतिसाद कोणता असेल ?

(1) तुमचे सध्याचे काम तुम्हाला पूर्णपणे व्यस्त ठेवत असल्यामुळे हे जादाचे काम स्वीकारणे तुम्हाला शक्य नाही.

(2) तुम्ही तुमच्या दुसऱ्या सहकाऱ्याचे नाव सुचवाल आणि ती या कामासाठी अधिक लायक असून तुमच्या तुलनेत तिच्याकडे कमी कार्यभार आहे असे सांगाल.

(3) विशिष्ट कालावधीत प्रकल्प पूर्ण करणे अगत्याचे असल्याने कोणताही युक्तिवाद न करता जादाचे काम स्वीकाराल.

(4) किमान चाकोरीच्या कामासाठी साहाय्यक व्यक्ती मिळत असेल तरच ही जादाची जबाबदारी स्वीकाराल.

**80.** तुम्ही मुक्त पत्रकार आहात. अलीकडे तुम्ही एका प्रदेशातील अल्पसंख्य जमातीला दोन दशकांहून अधिक वर्षांपूर्वी भोगावा लागलेला त्रास आणि त्यांचे झालेले विस्थापन यांच्या दस्तावेजांवर आधारित कादंबरी वाचली. तुम्ही या अल्पसंख्य जमातीतील आहात. या विस्थापनाच्या वास्तवाशी आणि दोन्ही जमातींच्या लोकांनी भोगलेल्या हलाखीशी तुम्ही चांगल्यापैकी परिचित आहात. तुमच्या मते लेखिकेने तिच्या लेखन कौशल्यांचा यशस्वीपणे वापर करून तुमच्या जमातीची पिळवणूक करणारे किती क्रूर होते यावर भर दिला आहे. यामुळे व्यापक समाजाच्या लोकांना तुमच्या जमातीने भोगलेल्या हालांची दखल घ्यायला लावण्यात कादंबरी यशस्वी ठरली आहे. पण हे सर्व अर्धसत्य आहे हे तुम्हाला माहीत आहे. ते तुम्हाला अस्वस्थ करते आहे. तुम्ही यावर विविध माध्यमांतून प्रकाशित करायच्या लेखांतून तुम्ही.

(1) निवडक दस्तावेज वापरून सर्वसामान्य समाजाकडून समानानुभूती मिळवण्यासाठी पिडितांची स्थिती पिडणाऱ्यांच्या तुलनेत पूर्णपणे वेगळी व त्यांच्यापेक्षा बिकट आहे असा प्रसार करण्यासाठी सादरीकरण कराल.

(2) जरी अल्पसंख्य जमात विस्थापित झाली तरीही पिळवणूक करणारे, नालायक ठरवले गेलेले, बहुसंख्य जमातीचे सदस्य गुन्हेगार नाहीत आणि दोन्ही जमातींच्या संकुचित पुढाऱ्यांकडून त्यांची दिशाभूल झाली होती ही वस्तुस्थिती निवडक दस्तावेजांचा पुरावा देऊन सादर कराल.

(3) पिळवणूक करणारे हक्क व आदर गमावण्याबरोबरीने रोजचा त्रास, दुर्दैव आणि निराशाग्रस्ततेचे बळी ठरले आहेत ही वस्तुस्थिती निवडक दस्तावेज वापरून सादर कराल.

(4) द्वेषभावाचा उद्रेक टाळण्यासाठी या दोन जमातीचे सदस्य दीर्घ कालखंडानंतर स्वत:च्या पिडित्वाच्या कथनांसंदर्भात आता स्वत:ची कशाप्रकारे व्याख्या करत आहेत याच्या दस्तावेजीकरणातून वास्तव सादर कराल.

राजमुद्रा अकॅडमी

## MPSC C-SAT 2022

**Decision making and problem solving questions no. 76 – 80.**

**76.** तुम्ही स्वतःच्या प्रामाणिकपणासाठी ख्यातनाम असलेले वरिष्ठ सरकारी सेवक आहात. तुमच्या अधिकाराखाली असलेल्या जिल्ह्यातील बहुसंख्य खेड्यांतील निम्न जातीच्या मानल्या जाणाऱ्या लोकांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा एक गट तुमच्याकडे आला आहे. या खेड्यांतील अनेक बौद्ध कुटुंबे सामाजिक बहिष्काराला तोंड देत दुःसह परिस्थितीत जगत आहेत. कोणत्याही प्रकारच्या सामाजिक भेदांच्या विरोधात असल्याने या चळवळीला पाठबळ द्यावे व त्यात कृतिशील सहभाग द्यावा अशा या कार्यकर्त्यांची अपेक्षा आहे. सरकारी वर्तन नियमांनुसार सरकारवर या लोकांच्या परिस्थितीसंबंधाने टीका करणाऱ्या कृतीत सहभागी होण्याला सरकारी कर्मचाऱ्यांवर सरकारी वर्तन नियमांनुसार बंदी आहे. या परिस्थितीत पुढे दिलेल्या यादीतून कोणता उचित कार्यमार्ग तुम्ही निवडाल ?

(1) तथाकथित उच्चवर्णीयांच्या दादागिरीमुळे अनेक लोकांना न्याय नाकारला जातो हे तुम्हाला माहीत आहे. त्यामुळे या प्रश्नासंदर्भात बदल घडवणे कठीण असले तरीही या गटाला पूर्ण पाठबळ देऊन आणि त्यांना दूरगामी कृतींची योजना आखायला तुम्ही मदत कराल याची खात्री द्याल.

(2) संबंधित लोकांच्या समस्यांत अधिक भर पडू नये म्हणून सामाजिक न्यायाच्या समस्येसंबंधाने कोणतीही कृती करण्यापासून या गटाला परावृत्त कराल.

(3) अगदी उच्च शिक्षित लोकांनाही या लोकांविषयी सहानुभूती नसते ही वस्तुस्थिती तुम्हाला माहीत आहे. यामुळे वर्तन नियमाआधारे अशा प्रकारच्या कोणत्याही कृतीत तुम्हाला सहभागी होता येत नाही हे गटाला स्पष्ट कराल.

(4) उच्चपदस्थ सरकारी अधिकाऱ्यांसह, तथाकथित उच्च वर्णीय लोक देखील अशा लोकांवरील सामाजिक बहिष्काराला पाठबळ देत असल्याने या समस्येशी संबंधित कोणताही हिंसाचार टाळण्यासाठी, कोणत्याही कार्यक्रमात व्यक्तिशः सहभागी न होता या गटाला तुम्ही नैतिक पाठबळ आणि पडेल ती मदत करण्याची खात्री द्याल.

77. तुम्ही शेतकरी कुटुंबातील आहात आणि शासकीय शेतीसंबंधित अधिकारी म्हणून काम करता. शेतकऱ्यांसाठी स्वतःच मित्र असलेल्या, स्वयंघोषित सेंद्रीय शेती तज्ज्ञ आणि प्रस्थ असलेल्या व्यक्तीची व्याख्याने तुम्ही आयोजित करावीत असे फर्मान शेतीसंबंधित मंत्र्याने काढलेले आहे. तुम्ही या व्यक्तीला अति महत्त्वाची व्यक्ती म्हणून सुविधा उपलब्ध कराव्यात अशी मंत्र्यांची अपेक्षा आहे. तुम्ही तुमच्या कुटुंबाचे अनुभवी सदस्य असल्याने या व्यक्तीच्या पद्धतींची वैज्ञानिक चाचणी झालेली नाही आणि त्याने दावा केलेल्या प्रमाणात उत्पादन होत नाही याची तुम्हाला खात्री आहे. तुम्ही

(1) शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शेतकऱ्यांना सेतुजालावर उपलब्ध असलेल्या वैज्ञानिक विदेवर प्रयोग करायला साहाय्य देणाऱ्या वैज्ञानिकाचे नाव सुचवाल.

(2) या मंत्र्यांना ही व्यक्ती लुच्ची आहे हे स्पष्ट कराल.

(3) मंत्र्यांना त्यांचा मित्र लुच्चा आहे हे समजावणे किती कठीण आहे हे तुम्हाला माहीत असल्याने तुम्ही या प्रस्थ असलेल्या व्यक्तीची भाषणे आयोजित कराल.

(4) अनेक वर्षे शेतकऱ्यांबरोबर काम करत असलेल्या आणि वैज्ञानिक विदा वापरून उत्पादन वाढवण्यासाठी सेंद्रीय खतांचा वापर करण्याच्या पद्धती रचलेल्या वैज्ञानिकाचे नाव शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सुचवाल.

78. दर वर्षी 20 मार्च हा दिवस जागतिक समाधान दिवस म्हणून साजरा केला जातो. अध्यापक आणि अध्ययनार्थींना समाधानाने जगण्याच्या प्रक्रियेबाबत जागरूक करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणून तुम्हाला शाळेत 'समाधान दिन' साजरा करायचा आहे. समाधान दिन साजरा करण्याच्या कल्पना मिळवण्यासाठी तुम्ही अध्यापक-पालक सभा घेतली. तुम्ही विविध वर्गांतील मुलांशी बोललात तेव्हा प्रौढ तसेच मुले यांच्या समाधानाच्या कल्पना समान आहेत असे तुम्हाला आढळले. स्वतः निवडलेल्या देवताच्या दर्शनासाठी रांगेत उभ्या असलेल्या भाविकांशी तुम्ही बोललात तेव्हा तेही मोठ्या रकमेतून विकत घेता येईल असे काही तरी मिळवण्यासाठी प्रार्थना करत होते. तुम्ही

(1) सभेला जमलेल्या बहुसंख्य लोकांनी सुचवल्यानुसार अध्यापक व अध्ययनार्थींना शाळेत समाधान देणारे काहीही करण्याची मुभा द्याल आणि प्रत्येकाने जीवनात अनुभवलेल्या काही समाधान देणाऱ्या घटनांची थोडक्यात माहिती लिहिण्याची विनंती कराल.

(2) स्वतःचे काम करत आनंदाने जगणाऱ्या आणि साधे आयुष्य जगणाऱ्या तुमच्या निरीक्षणातील काही लोकांना बोलावून त्यांना स्वतःचे अनुभव विद्यार्थ्यांबरोबर सहभागी करण्याची विनंती कराल.

(3) अध्यापक आणि पालक यांची सहभागाने समाधानविषयक कल्पना रचण्यासाठी आणि प्रत्येक अध्ययनार्थीला अध्ययन प्रक्रिया आनंददायी वाटण्यासाठी अध्ययन अनुभव रचण्यासाठी साहाय्य देण्यासाठी सत्रे आयोजित कराल.

(4) नियमितपणे आध्यात्मिक व्याख्यान ऐकणाऱ्या मोजक्या लोकांनी सुचवल्यानुसार विद्यार्थी व अध्यापकांना शाश्वत समाधानाची जाणीव करून देण्यासाठी ख्यातनाम आध्यात्मिक व्यक्तीचे व्याख्यान आयोजित कराल.

79. जीवअभियांत्रिकी कंपनीत तुम्ही एका संशोधन गटाचे प्रमुख आहात. एका प्रख्यात परदेशी प्रयोगशाळेत खास अशा प्रात्यक्षिक प्रशिक्षणासाठी तुम्ही प्रस्ताव दिला होता. तुमच्या नजिकच्या वरिष्ठ पर्यवेक्षकीय प्रमुखाने पारित केलेल्या आदेशानुसार तुमच्या गटातील तीन सदस्यांच्या नावाची शिफारस या प्रशिक्षणासाठी केलेली आहे. दुसऱ्या एका प्रकल्पासंदर्भात वरिष्ठाशी झालेल्या मतभेदांमुळे जाणीवपूर्वक त्याने असे केले असावे असा तुम्हाला संशय आहे. यावर तुमची पहिली कृती असेल,

(1) स्वतःचे माध्यमसंपर्क आणि सामाजिक माध्यमे वापरून प्रशिक्षणासाठी वरिष्ठाने तुमच्या नावाची शिफारस करावी यासाठी त्याच्यावर दबाव आणणे.

(2) तुमच्यावर झालेल्या अन्यायाविषयी तुमच्या वरिष्ठाच्या वरिष्ठांना जागरूक करण्यासाठी त्यांची भेट घेणे.

(3) प्रशिक्षणासाठी तुमची शिफारस न करण्याचे कारण जाणून घेण्यासाठी आणि गरज पडल्यास तुमची शिफारस करण्यासाठी तुमची बाजू मांडण्यासाठी तुम्ही संबंधित वरिष्ठांशी बोलाल.

(4) संबंधित अधिकाऱ्यांकडे या परिस्थितीसंबंधाने लेखी तक्रार दाखल करणे.

80. तुम्हा एका कचेरीचे प्रमुख आहात. कचेरी सचिवालयावर कचेरी कर्मचाऱ्यांसाठी आरक्षित असलेल्या मर्यादित संख्याने असलेल्या घरांच्या वाटपाची जवाबदारी आहे. ही घरे कचेरीच्या जवळ आहेत. संस्थेच्या उच्चपदस्थांनी घालून दिलेल्या नियमांनुसार हे वाटप केले जाते व ते नियम सचिवालयाकडून जाहीर झाले आहेत. तुमची दूरची नातेवाईक याच कचेरीत तुमची वरिष्ठ साहाय्यक म्हणून काम करते. तिला तिच्या सासरच्या आजारी माणसांची काळजी घ्यावी लागत असल्यामुळे घराच्या वाटपात तिला प्राधान्य दिले पाहिजे अशी तिने विनंती केली आहे. एका अन्य कनिष्ठ कर्मचाऱ्याने देखील त्याला त्याच्या आजारी पत्नीची काळजी घ्यावी लागत असल्याने त्याला घर द्यावे अशी विनंती सचिवालयाकडे केली आहे. सचिवांनी नियमांकडे बोट दाखवून तिची विनंती नाकारली आहे आणि त्याच नियमांच्या आधारे कनिष्ठाच्या कामाचे स्वरूप विचारात घेऊन त्याला घर दिले आहे. आता तुमची नातेवाईक तुम्ही त्या कनिष्ठ कर्मचाऱ्याला दिलेले घर तिला मिळवून द्यावे, यासाठी तुमच्यावर दबाब आणत आहे आणि तुम्हाला तिची निराशा टाळायची आहे. तुम्ही

(1) सचिवालयाला वाटपाचा आदेश राखून ठेवण्याचा आणि वाटप जाहीर करणे शक्य तेवढे लांबवण्याचा आदेश द्याल.

(2) नातेवाईकांच्या आजारासारख्या व्यक्तिगत समस्येसारख्या कोणत्याही विनंतीला विचारात न घेता घरांचे वाटप करण्याचे आदेश सचिवालयाला द्याल.

(3) तिचे व इतर नातेवाईकांचे तुमच्याबरोबरचे संबंध ताणले जाण्याची शक्यता असूनही निर्धारित नियम काटेकोरपणे पाळले असल्यामुळे सचिवालयाच्या टिपणाशी सहमत व्हाल.

(4) तुमच्या उपस्थितीत तिची विनंती विचारात न घेण्याच्या निर्णयासंबंधीची तात्विक बैठक तिच्यासाठी स्पष्ट करण्याची विनंती सचिवालयाला कराल.

**७६. तुम्हाला एका कचेरीचे प्रमुख आहात. कचेरी सचिवालयावर कचेरी कर्मचाऱ्यांसाठी आरक्षित असलेल्या मर्यादित संख्याने असलेल्या घरांच्या वाटपाची जबाबदारी आहे. ही घरे कचेरीच्या जवळ आहेत. संस्थेच्या उच्चपदस्थांनी घालून दिलेल्या नियमांनुसार हे वाटप केले जाते व ते नियम सचिवालयाकडून जाहीर झाले आहेत. तुमची दूरची नातेवाईक याच कचेरीत तुमची वरिष्ठ सहाय्यक म्हणून काम करते. तिला तिच्या सासरच्या आजारी माणसांची काळजी घ्यावी लागत असल्यामुळे घराच्या वाटपात तिला प्राधान्य दिले पाहिजे अशी तिने विनंती केली आहे. एका अन्य कनिष्ठ कर्मचाऱ्याने देखील त्याला त्याच्या आजारी पत्नीची काळजी घ्यावी लागत असल्याने त्याला घर द्यावे अशी विनंती सचिवालयाकडे केली आहे. सचिवांनी नियमांकडे बोट दाखवून तिची विनंती नाकारली आहे आणि त्याच नियमांच्या आधारे कनिष्ठाच्या कामाचे स्वरुप विचारात घेवून त्याला घर दिले आहे. आता तुमची नातेवाईक तुम्ही त्या कनिष्ठ कर्मचाऱ्याला दिलेले घर तिला मिळवून द्यावे, यासाठी तुमच्यावर दबाव आणत आहे आणि तुम्हाला तिची निराशा टाळायची आहे. तुम्ही...**

१. सचिवालयाला वाटपाचा आदेश राखून ठेवण्याचा आणि वाटप जाहीर करणे शक्य तेवढे लांबवण्याचा आदेश द्याल.

२. नातेवाईकांच्या आजारासारख्या व्यक्तिगत समस्येसारख्या कोणत्याही विनंतीला विचारात न घेता घरांचे वाटप करण्याचे आदेश सचिवालयाला द्याल.

३. तिचे व इतर नातेवाईकांचे तुमच्याबरोबरचे संबंध ताणले जाण्याची शक्यता असूनही निर्धारित नियम काटेकोरपणे पाळले असल्याुळे सचिवालयाच्या टिपणाशी सहमत व्हाल.

४. तुमच्या उपस्थितीत तिची विनंती विचारात न घेण्याच्या निर्णयासंबंधीची तात्विक बैठक तिच्यासाठी स्पष्ट करण्याची विनंती सचिवालयाला कराल.

---

**७७. तुम्ही स्वत:च्या प्रामाणिकपणासाठी ख्यातनाम असलेले वरिष्ठ सरकारी सेवक आहात. तुमच्या अधिकाराखाली असलेल्या जिल्हयातील बहुसंख्य खेडयांतील निम्न जातीच्या मानल्या जाणाऱ्या लोकांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा एक गट तुमच्याकडे आला आहे. या खेडयांतील अनेक बौध्द कुटूंबे सामाजिक बहिष्काराला तोंड देत दु:सह परिस्थितीत जगत आहेत. कोणत्याही प्रकारच्या सामाजिक भेदांच्या विरोधात असल्याने या चळवळीला पाठबळ द्यावे व त्यात कृतिशील सहभाग द्यावा अशा या कार्यकर्त्यांची अपेक्षा आहे. सरकारी वर्तन नियमांनुसार सरकारवर या लोकांच्या परिस्थितीसंबंधाने टिका करणाऱ्या कृतीत सहभागी होण्याला सरकारी कर्मचाऱ्यांवर सरकारी वर्तन नियमांनुसार बंदी आहे. या परिस्थितीत पुढे दिलेल्या यादीतून कोणता उचित कार्यमार्ग तुम्ही निवडाल?**

१. तथाकथित उच्चवर्णियांच्या दादागिरीमुळे अनेक लोकांना न्याय नाकारला जातो हे तुम्हाला माहीत आहे. त्यामुळे या प्रश्नासंदर्भात बदल घडवणे कठीण असले तरीही या गटाला पूर्ण पाठबळ देवून आणि त्यांना दूरगामी कृतींची योजना आखायला तुम्ही मदत कराल याची खात्री द्याल.

२. संबंधित लोकांच्या समस्यांत अधिक भर पडू नये म्हणून सामाजिक न्यायाच्या समस्येसंबंधाने कोणतीही कृती करण्यापासून या गटाला परावृत्त कराल.

३. अगदी उच्च शिक्षित लोकांनाही या लोकांविषयी सहानुभूती नसते. ही वस्तुस्थिती तुम्हाला माहित आहे. यामुळे वर्तन नियमाआधारे अशा प्रकारच्या कोणत्याही कृतीत तुम्हाला सहभागी होता येत नाही हे गटाला स्पष्ट कराल.

४. उच्चपदस्थ सरकारी अधिकाऱ्यांसह, तथाकथित उच्च वर्णीय लोक देखील अशा लोकांवरील सामाजिक बहिष्काराला पाठबळ देत असल्याने या समस्येशी संबंधित कोणताही हिंसाचार टाळण्यासाठी, कोणत्याही कार्यक्रमात व्यक्तिशः सहभागी न होता या गटाला तुम्ही नैतिक पाठबळ आणि पडेल ती मदत करण्याची खात्री द्याल.

---

**७८. तुम्ही शेतकरी कुटूंबातील आहात आणि शासकीय शेतीसंबंधित अधिकारी म्हणून काम करता. शेतकऱ्यांसाठी स्वत:च मित्र असलेल्या, स्वयंघोषित सेंद्रीय शेती तज्ज्ञ आणि प्रस्थ असलेल्या व्यक्तीची व्याख्याने तुम्ही आयोजित करावीत असे फर्मान शेतीसंबंधित मंत्र्याने काढलेले आहे. तुम्ही या व्यक्तीला अति महत्वाची व्यक्ती**

राजमुद्रा अॅकॅडमी, लातूर

**म्हणून सुविधा उपलब्ध कराव्यात अशी मंत्र्यांची अपेक्षा आहे. तुम्ही तुमच्या कुटूंबांचे अनुभवी सदस्य असल्याने या व्यक्तीच्या पध्दतींची वैज्ञानिक चाचणी झालेली नाही आणि त्याने दावा केलेल्या प्रमाणात उत्पादन होत नाही याची तुम्हाला खात्री आहे. तुम्ही**

१. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शेतकऱ्यांना शेतमजूरावर उपलब्ध असलेल्या वैज्ञानिक विदेवर प्रयोग करायला साहाय्य देणाऱ्या वैज्ञानिकाचे नाव सुचववाल.

२. या मंत्र्यांना ही व्यक्ती लुच्ची आहे हे स्पष्ट कराल.

३. मंत्र्यांना त्यांचा मित्र लुच्चा आहे हे समजावणे किती कठीण आहे हे तुम्हाला माहित असल्याने तुम्ही या प्रस्थ असलेल्या व्यक्तींची भाषणे आयोजित कराल.

४. अनेक वर्ष शेतकऱ्यांबरोबर काम करत असलेल्या आणि वैज्ञानिक विदा वापरुन उत्पादन वाढवण्यासाठी सेंद्रीय खतांचा वापर करण्याच्या पध्दती रचलेल्या वैज्ञानिकाचे नाव शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सुचवाल.

---

**७९. दर वर्षी २० मार्च हा दिवस जागतिक समाधान दिवस म्हणून साजरा केला जातो. अध्यापक आणि अध्ययनार्थींना समाधानाने जगण्याच्या प्रक्रियेबाबत जागरुक करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणून तुम्हाला शाळेत 'समाधन दिन' साजरा करायचा आहे. समाधान दिन साजरा करण्याच्या कल्पना मिळवण्यासाठी तुम्ही अध्यापक–पालक सभा घेतली. तुम्ही विविध वर्गातील मुलांशी बोलतात तेंव्हा प्रौढ तसेच मुले यांच्या समाधानाच्या कल्पना समान आहेत असे तुम्हाला आढळले. स्वतः निवडडलेल्या देवताच्या दर्शनासाठी रांगेत उभ्या असलेल्या भाविकांशी तुम्ही बोलतात तेंव्हा तेही मोठया रकमेतून विकत घेता येईल असे कांही तरी मिळण्यासाठी प्राथ्रना करत होते. तुम्ही...**

१. सभेला जमलेल्या बहुसंख्य लोकांनी सुचवल्यानुसार अध्यापक व अध्ययनार्थींना शाळेत समाधान देणारे कांहीही करण्याची मुभा द्याल आणि प्रत्येकाने जीवनात अनुभवलेल्या काही समाधान देणाऱ्या घटनांची थोडक्यात माहिती लिहिण्याची विनंती कराल.

२. स्वतःचे काम करत आनंदाने जगणाऱ्या आणि साधे आयुष्य जगणाऱ्या तुमच्या निरिक्षणातील काही लोकांना बोलावून त्यांना स्वतःचे अनुभव विद्यार्थ्यांबरोबर सहभागी करण्याची विनंती कराल.

३. अध्यापक आणि पालक यांची सहभागाने समाधानविषयक कल्पना रचण्यासाठी आणि प्रत्येक अध्ययनार्थीला अध्ययन प्रक्रिया आनंददायी वाटण्यासाठी अध्ययन अनुभव रचनण्यासाठी सहाय्य देण्यासाइी सत्रे आयोजित कराल.

४. नियमितपणे आध्यात्मिक व्याख्यान ऐकणाऱ्या मोजक्या लोकांनी सुचवल्यानुसार विद्यार्थी व अध्यापकांना शाश्वत समाधानाची जाणीव करुन देण्यासाइी ख्यातनाम आध्यात्मिक व्यक्तीचे व्याख्यान आयोजित कराल.

---

**८०. जीवअभियांत्रिकी कंपनीत तुम्ही एका संशोधन गटाचे प्रमुख आहात. एका प्रख्यात परदेशी प्रयोगशाळेत खास अशा प्रात्यक्षिक प्रशिक्षणासाठी तुम्ही प्रस्ताव दिला होता. तुमच्या नजिकच्या वरिष्ठ पर्यवेक्षकीय प्रमुखाने पारित केलेल्या आदेशानुसार तुमच्या गटातील तीन सदस्यांच्या नावाची शिफारस या प्रशिक्षणासाठी केलेली आहे. दुसऱ्या एका प्रकल्पासंदर्भात वरिष्ठाशी झालेल्या मतभेदांमुळे जाणीवपूर्वक त्याने असे केले असावे असा तुम्हाला संशय आहे.**

१. स्वतःचे माध्यमसंपर्क आणि सामाजिक माध्यमे वापरुन प्रशिक्षणासाठी वरिष्ठाने तुमच्या नावाची शिफारस करावी यासाठी त्याच्यावर दबाव आणणे.

२. तुमच्यावर झालेल्या अन्यायाविषयी तुमच्या वरिष्ठाच्या वरिष्ठांना जागरुक करण्यासाठी त्यांची भेट घेणे.

३. प्रशिक्षणासाठी तुमची शिफारस न करण्याचे कारण जाणून घेण्यासाठी आणि गरज पडल्यास तुमची शिफारस करण्यासाठी तुमची बाजू मांडण्यासाठी तुम्ही संबंधित वरिष्ठांशी बोलाल.

४. संबंधित अधिकाऱ्यांकडे या परिस्थितीसंबंधाने लेखी तक्रार दाखल करणे.

---

| प्र.क्र. | संच – A | | | |
|---|---|---|---|---|
| | पर्याय क्रमांक व गुण | | | |
| | १ | २ | ३ | ४ |
| 76 | 0 | 1 | 1.5 | 2.5 |
| 77 | 2.5 | 0 | 1 | 1.5 |
| 78 | 15 | 1 | 0 | 2.5 |
| 79 | 1.5 | 1 | 2.5 | 0 |
| 80 | 0 | 1 | 2.5 | 1.5 |

राजमुद्रा अकॅडमी, लातूर

**७६. तुम्ही वैद्यकीय व्यावहारिक आहात आणि एका ख्यातनाम शैक्षणिक संस्थेने व्यक्तींची संस्थेत नेमणूक करण्यापूर्वी त्यांच्या स्वास्थ्याचा प्रमाणपत्रे देण्यासाठी तुमची नेमणूक केली आहे. अनेक उमेदवारांतून X या उच्चशिक्षित व्यक्तीची मुलाखत घेवून तिची एक विभागातील प्रमुखांनी अध्यापकांच्या पदासाठी निवड केली आहे कारण मुलाखतकारांच्या गटाला ती व्यक्ती खुपच सक्षम आढळली. याच विभागात कार्यरत असलेले, तुमच्या समाजाचे दोन सदस्य तुम्हाला भेटले व त्यांनी X च्या सुदृढतेबाबत नकारात्मक प्रमाणपत्र द्यावे असा तुमच्यावर दबाव आणला आहे. त्यांना एकाच समाजाचे सदस्य असलेल्या X ला आणि त्या विभागाच्या प्रमुखांना अडचणीत आणण्यात स्वारस्य आहे. या व्यक्ती भविष्यात स्वतःचे संपर्क वापरुन तुमची या संस्थेने केलेली नेमणूक रद्द करतील अशीही शक्यता आहे. तुम्ही .......**

१. ....तुम्ही तिघेही जरी एकाच समूहाच असला तरीही स्वतःची नेमणूक त्यांच्या सूचना पाळण्यासाठी झालेली नाही असे त्यांना सांगाल.

२. ..... या व्यक्तींचा दबाव टाळण्यासाठी तुमच्या परीने प्रयत्न करुन नेमणुक काही काळासाठी रोखून संबंधित व्यक्तींना काही काळ त्रासात टाकाल.

३. ..... स्वतःची संस्थेतील नेमणुक वाचवण्यासाठी 'ज्या कामासाठी ही व्यक्ती निवडली आहे ते ती करु शकणार नाही कारण तिचे हृदय खूपच मोठे आहे' असे प्रमाणपत्र द्याल.

४. ...... कोणताही भेदभाव न बाळगता तुमचे काम तुम्हाला कर्तव्यदक्षतेने व प्रामाणिकपणे करु द्या अशी विनंती तुम्ही या दुकलीला कराल.

---

**७७. तुम्ही शेती व्यवसाय करता आणि काही एकर जमिनीचे मालक आहात. आसपासचे अल्पभूधारक शेतकरी आणि जमीन नसलेले लोक तुमच्या शेतावर कामगार म्हणून राबतात. कीटकनाशकांच्या फवारणीसह ते सर्व प्रकारची कामे करतात. तुमच्या जिल्हयांतील अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत आणि करत आहेत. यात तुमच्या कामगारांतले काहीपण समाविष्ट आहेत. कीटकनाशके व्यक्तींना आत्महत्येला प्रवृत्त करण्यात महत्वाची भूमिका बजावतात असा दावा जगभरात केलेल्या अनेक अभ्यासातून केला आहे अशी माहिती देणारा वर्तमानपत्रातील लेख तुमच्या वाचनात आला. कीटकनाशके पिवून आत्महत्या करण्यापुरते हे मर्यादित नाही. हाताळताना किंवा फवारताना कीटकनाशकाचे रेणू श्वासाबरोबर घेतले जातात आणि वर्षानुवर्षे शरीरात जमा जात हातात. हे रेणू मानवी मेंदूवर व मज्जासंस्थेवर परिणाम करतात. यातून या व्यक्तींत नैराश्य, उदासी व आत्मघातकी वृत्ती विकसित होतात. या माहितीला तुमचा प्रतिसाद काय असेल?**

१. मी माझ्या कामगारांना उच्च दर्जाची सुरक्षा साधने पुरवेल आणि त्यांना आवश्यक काळजी घेवून कीटकनाशके हाताळण्याचे आणि फवारण्याचे प्रशिक्षण देईन.

२. मी सर्व जीवघातक रासायनिक कीटकनाशके वापरणे थांबवेन आणि निपजेची पर्वा न करता माझे पीक कीटकांपासून वाचवण्यासाठी अन्य उपायांचा अवलंब करेन.

३. मी विश्वासू तज्ज्ञांशी सल्लामसलत करेन किंवा आंतरजाल वापरुन खात्रीची माहिती मिळवून, महाग असली तरीही सुरक्षित कीटकनाशकांची उपलब्धता शोधून काढेन.

४. मी आणखी संशोधन निष्कर्षासाठी थांबेन आणि तोपर्यंत कीटकांपासून माझी पिके सुरक्षित ठेवण्यासाठी आता वापरत असलेली कीटकनाशके वापरणे सुरु ठेवेन.

---

**७८. तुम्ही शिशु हे पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या खाजगी शैक्षणिक संस्थेचे संचालक आहात. कोणतेही निर्बंध नसलेली माहिति सामाजिक माध्यमांतून प्रसारित होत आहे आणि अशा माहितीच्या सर्वात जास्त संस्काक्षम व्यक्तींवर होणाऱ्या परिणांबाबत तुम्हाला काळजी वाटत आहे. तुम्ही....**

१. तुमच्या संस्थेच्या सर्व संकुलांत महाजाल सुविधेवर पूर्णपणे बंदी घालाल.

२. बातम्यांवर आधारित निर्णय घेताना आणि कृती करताना काळजी घेण्याची शपथ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना विनंती कराल.

३. वेळापत्रकाची रचना करुन अध्यापकांना वर्गात कांही वेळ उपलब्ध करुन खोटया बातम्यांमुळे होणाऱ्या हानीवर चर्चा घेण्याची विनंती कराल.

४. विश्लेषण करुन खोटया बातम्या ओळखणे हा अभ्यासक्रमाचा अनिवार्य भाग बनवून विद्यार्थ्यांना सक्षम होण्यासाठी साहाय्य कराल.

राजमुद्रा अॅकॅडमी, लातूर

**७९. तुम्ही जिल्हा पोलीस विभागाच्या सामाजिक कक्षाच्या प्रमुख आहात. स्त्रियांचा एक गट तुम्हाला भेटायला आला आहे. आणि यातील कांहीजणी विवाहित तर कांहीजणी अविवाहित आहेत. कुटूंबाच्या भरभराटीसाठी आशिर्वाद मिळवण्यासाठी, पुढील महिन्याच्या शेवटच्या आठवडयात होणाऱ्या एका पवित्र साधूच्या 'गुरु-सेवा' कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी त्यांच्यावर त्यांच्या कुटूंबाकडून दबाव**

१. ...... स्वतःच्या कुटूंबाच्या भरभराटीसाठी आशिर्वाद मिळवण्यासाठी त्यांनी गुरुसेवेत सहभाग देणे हे त्यांचे कर्तव्य आहे असे तुम्ही स्त्रियांना पटवून द्याल.

२. ..... प्रत्येकीकडून लेखी तक्रारीची मागणी कराल आणि कुटूंबातील कोणत्याही सदस्यावर त्याच्या वा तिच्या इच्छेशिवाय अशा प्रकारच्या कार्यक्रमांत सहभागी होण्याची सक्ती करणे बेकायदेशिर आहे असे सांगणारे उचित शब्दातील सूचनापत्र संबंधित कुटूंबाला पाठवाल.

३. ...... अंधश्रध्दा निर्मूलनासाठी काम करणाऱ्या अशासकीय संस्थेच्या मदतीने त्यांनी स्वतःच्या कौटुंबिक समस्येला तोंड देणे अधिक चांगले हे तुम्ही त्या स्त्रियांना पटवून द्याल.

४. ..... अशासकीय संस्था, शाळा व महाविद्यालये यांच्या मदतीने जिल्हयातील लोकांना, व्यक्तीवर तिच्या इच्छेविरुध्द अशा कार्यक्रमात सहभागी होण्याची सक्ती करणे बेकायदेशीर आहे. ह्या तथ्याबाबत जागरुक करण्यासाठी मोहीम संघटित कराल.

---

**८०. तुम्ही नगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून कार्यरत आहात. वडिलांच्या अकाली मृत्यूनंतर तुम्ही नगरपालिकेत कामाला सुरुवात केली. १० वीत अनुत्तीर्ण असुनही तुम्ही खुप वाचन करता. तुमचे वाचनातील स्वारस्य पाहून विभागातील मुख्य पर्यवेक्षकांनी तुम्हाला शिक्षण पुढे चालू ठेवून स्वतःचे नशीब बदलण्यासाठी प्रोत्साहन दिले. स्वतःच्या व्यक्तिगत प्रयत्नांतून तुम्ही वाणिज्य शाखेतील पदवी आणि समाज सेवेतील पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. आता सामाजिक विज्ञान शिक्षण संस्थेत संशोधन सुरु ठेवण्यासाठी तुम्हाला परदेशी अभ्यासवृत्ती मिळाली आहे आणि तुम्ही अभ्यास रजेसाठी अर्ज दिला आहे. नगरपालिकेच्या नियमानुसार, कर्मचाऱ्याला शिक्षण सुरु ठेवण्यासाठी दोन वर्षाची वेतनासह रजा मिळते. परंतु नगरपालिका प्रमुखांनी तुमचा अर्ज नामंजूर करुन तुम्हाला मागे खेचायला, ' तुम्हाला जर उच्च शिक्षण मिळाले तर सफाईचे काम कोण करणार?' असा प्रश्न विचारला. ही समस्या निपटण्यासाठी तुम्ही पुढील यादीतील कोणता मार्ग निवडाल?**

१. उच्च पदावर नेमणूका झालेल्या निम्न सामाजिक स्तरातील व्यक्तींना छळण्याच्या अनेक तथाकथित उच्च जातीच्या लोकांच्या वृत्तीचा तुम्हाला चांगल्यापैकी परिचय असल्याने तुम्ही तुमचे पुढील शिक्षण सोडून द्याल.

२. कर्मचारी म्हणून नगरपालिका आस्थापनाकडून कोणाही व्यक्तीसाठी शैक्षणिक रजेची सुविधा आहे आणि संविधानाविषयी तो दाखवत असलेल्या अनादराची आठवण करुन देण्यासाठी या व्यक्तीशी संयमाने बोलाल.

३. अर्ज नाकारण्याची सर्व तथ्ये जाणून घेवून कार्यकर्त्यांच्या मदतीने विविध पध्दती व माध्यमे वापरुन आंदोलन संघटित कराल.

४. अर्जाच्या नकारावर लक्ष केंद्रीत करुन या प्रकारच्या समस्यांची दखल घेणाऱ्या संबंधित उच्चाधिकाऱ्यांना, राष्ट्रीय उच्चाधिकाऱ्यांसह, सर्व संबंधितांना या घटनेबाबत जागरुक कराल.

राजमुद्रा अॅकॅडमी, लातूर

**७६. नफा वाढवण्याच्या हेतूने एका उत्पादनाचा दर्जा बदलण्याशी संबंधित काही निर्णय घेण्यात तुमच्या वरिष्ठ जबाबदार होत्या परंतु दुर्दैवाने विक्री घटल्याने त्यामुळे त्यात तोटा झाला. या समस्येच्या चौकशीसाठी आस्थापन व्यवस्थापनाने समिती संघटित केली आहे. या समितीने या प्रश्नासंबंधाने माहिती घेण्यासाठी तुम्हाला पाचारण केले आहे. घेतलेल्या निर्णयाची तुम्ही पाठराखण करावी असे तुमच्या वरिष्ठांचे तुम्हाला सांगणे आहे. येत्या दोन–तीन वर्षासाठी त्या तुमच्या वरिष्ठ असणार आहेत. तुम्ही,**

१. परिस्थितीचे निःपक्षपाती वर्णन कराल आणि भविष्यात नुकसान टाळण्यासाठी अशा स्वरुपाच्या निर्णयासंबंधीचे तुमचे चिकित्सक दृष्टिकोन तुम्ही व तुमचे संघ सदस्य कनिष्ठ असूनही आग्रहाने मांडाल याची समितीला खात्री द्याल.

२. वरिष्ठांवर दोषारोप येण्यामुळे त्याचा त्यांच्या व तुमच्या व्यावसायिक सहसंबंधांवर परिणाम होण्याची शक्यता असूनही जे काही घडले त्यचे यथातथ्य वर्णन कराल.

३. या घटनेशी संबंधित जे काही घडले त्याचे यथातथ्य वर्णन कराल आणि तसे करताना वरिष्ठांनी तुमच्यासारख्या कनिष्ठ सहाय्यकांचा सल्ला कसा झटक्यात फेटाळून लावला यावर भर द्याल.

४. तुमच्या वरिष्ठांना अपमानापासून वाचवण्यासाठी तसेच तुमच्या व त्यांच्या व्यावसायिक सहसंबंधात बाधा येवू नये यासाठी संबंधित घटनेसंबंधाने तुम्ही अनभिज्ञ आहात असे दाखवाल.

---

**७७. तुमच्या भागात स्वच्छता उपक्रम संघटित करणाऱ्या एका कृतिशील गटाचे तुम्ही सदस्य आहात. दर पाच दिवसांनी भारतात एक सफाई कर्मचारी मरतो ही बातमी ऐकल्यापासून गटाचे सर्व सदस्य अस्वस्थ झालेले आहेत आणि या परिस्थितीत तुम्हाला बदल करायचा आहे. विपनावस्थेत असलेला सफाई कर्मचारी जेंव्हा गटारात गुदमरुन किंवा अपघाताने मरतो तेंव्हाच त्याची बातमी बनते व कोणीही स्वतःच्या अधिकारात 'ही आमची समस्या आहे, आम्ही त्यावर उपाय करु' असे म्हणताना ऐकू येत नाही. जरी अनेक ख्यातनाम व्यक्ती सफाई करणे हा 'आध्यात्मिक अनुभव आहे' असे सांगत असले तरी प्रत्येक सफाई कर्मचारी अन्य लोकांची विष्टा हाताने साफ करतो कारण त्याच्याकडे पर्याय नसतो आणि ज्या जमाती सफाईशी जोडलेल्या आहेत त्यात जन्माला येणाऱ्यांना पर्यायी नोकऱ्या मिळत नाहीत या वस्तुस्थितीशी तुम्ही सर्व परिचम आहात. काही संस्थांच्या अंदाजानुसार आपल्या देशातील अशा सफाई कर्मचाऱ्यांची संख्या १,५०,००० च्या जवळपास असावी. या गटाचे सदस्य म्हणून तुम्ही इतर सदस्यांना ......प्रेरित करायला प्राधान्य द्याल.**

१. ........ निधी गोळा करुन हे हातसफाईचे असभ्य (?) काम स्वतःवर घेणारे तांत्रिक उपकरण विकसित करण्यासाठी अन्वेषक गाठण्याला.....

२. ......सफाई कर्मचारी हातसफाईचा आणि भेदभाव सहन करण्याचा प्रदीर्घ इतिहास असलेल्या जातींतून येत असल्यामुळे याचा सामाजिक प्रश्न म्हणुन गुंता सोडवण्याला.....

३. .....जेंव्हा व्यक्ती अशा जातीत वाढते तेंव्हा तिची किंवा त्याची अन्यायाच्या विरोधात उभे टाकण्याची क्षमता जन्मतःच पांगळी केली जाते म्हणून सफाई कर्मचाऱ्यांना सक्षम व्हायला साहाय्य करण्याला.....

४. ....सर्वसाधारण जनतेला अशा व्यक्तींच्या दुर्दशेसंबंधाने संवेदनशील बनवण्यासाठी सामाजिक माध्यमे वापरुन त्यांचे जीवन सुरक्षित करण्यासाठी आणि तो किमान त्यांच्यासाठी शाप ठरु नये यासाठी शासनावर दबाव टाकण्यासाठी तसेच आवश्यक निधी गोळा करण्यासाठी त्यांना सकत्र येण्याचे आवाहन करण्याला....

---

**७८. तुम्ही एका भागाची जबाबदारी असलेले वरिष्ठ नागरी अधिकारी आहात आणि तुम्हाला वृध्दांसाठी खाजगीरीत्या चालवल्या जाणाऱ्या घरांच्या वार्षिक संम्मेलनासाठी अतिथी म्हणून उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली आहे. या जागी पोहचण्यासाठी प्रवास करताना तुम्हाला जागोजागी मोडकळीला आलेल्या झोपडयांच्या अनेक वस्त्या पाहायला मिळाल्या. जेंव्हा तुम्ही चौकशी केली तेंव्हा वृध्दांसाठी घरे निर्माण करणाऱ्या विकासकांनी त्यांचे सर्व स्त्रोत हडप केले असून त्यांना लहानशा जागेत राहण्यास भाग पाडले असल्याचे या लोकांनी सांगितले. वृध्दांसाठी घरांची वस्ती निर्माण करणारे व त्यात राहणारे लोक उच्च जातीचे असल्यामुळे ते त्यांना नदीचे पाणी वापरण्यास, नदीत आंघोळ करण्यास वा मासेमारी करण्यास, वनौपज वापरण्यास मज्जाव करत असल्याचेही त्यांनी तुम्हाला सांगितले. तुम्ही पुढीलपैकी .......प्राधान्य द्याल.**

राजमुद्रा अकॅडमी, लातूर

१. ..... या भागाच्या नागरी क्षेत्रातील महाविद्यालयांतील, स्वतःच्या विद्यार्थ्यांना मानव्य आणि समाजविज्ञानातील सिध्दांतासंबंधाने व्यावहारिक अनुभव घ्यायला मदत देण्यात स्वारस्य असणाऱ्या अध्यापकांच्या मदतीने त्या भागातील लोकांचे सक्षमीकरण करण्याची योजना आखून ती महामंडळाकडून निधी मिळवून कार्यान्वित करण्याला....

२. .....भेट रद्द करुन, संयोजकांकडे या परिस्थितीबाबत स्वतःची नाराजी व्यक्त करुन त्या भागातील लोकांना तेथील स्त्रोत उपभोगू देतांना त्यांचा हक्क त्यांना द्यावा असा आदेश त्यांना देण्याला.....

३. ..... सम्मेलनाला उपस्थित रहाल व परिस्थितीबाबत योग्य माहिती मिळवून मित्रभावनेने संयोजकांना व रहिवाशांना स्त्रोतांच्या खऱ्या मालकांबद्दल सहानुभूती दाखवण्याबद्दल समजावून देण्याला...

४. ......... काहीही कार्यवाही करणार नाही कारण प्रत्येकाला स्वतःच्या नशिबासह जगावे लागते यावर तुमचा विश्वास ठेवण्याला....

---

**७९. पर्यावरणीय अंकेक्षणात विशेषज्ञ असणाऱ्या एका अशासकीय संस्थेचे प्रमुख म्हणून तुम्ही काम करत आहात. शासनाच्या मालकीच्या कोळसा वापरुन उर्जा उत्पादन करणाऱ्या विभागांबद्दल तुमच्या चमुने अहवाल गठित केला आहे. या विभागांनी प्रदुषण संकेत पूर्णतया धुडकावून दिल्याचे तुमच्या अहवालातून दाखवले आहे. जर हा अहवाल प्रसिध्द केला तर तुम्ही काम करत असलेल्या संस्थेची नोंदणी रद्दल करण्यात येईल अशी धमकी काही शासकीय अधिकारी तुम्हाला देत आहेत. ते शासकीय प्रयोगशाळांवर या विभागांबाबत त्यांच्या सोयीचा अहवाल सादर करण्यासाठी दबाव आणत आहेत व यामुळे तुमच्या अशासकीय संस्थेची विश्वासर्हता डागाळली जाणार आहे. या परिस्थितीत तुम्ही .......... प्राधान्य द्याल.**

१. ........तुमचे निष्कर्ष अशाच प्रकारच्या कामात गुंतलेल्या अन्य त्रयस्थ संस्थेच्या प्रयोगशाळेकडून दुजोरा मिळवून नंतर ते जनतेसाठी उघड करण्याला.....

२. .....कालबाह्य यंत्रसामग्रीवर ठपका ठेवत अहवाल आहे तसा उघड करण्याला....

३. ..... हा अहवाल प्रथम सर्वोच्च वरिष्ठांकडे सादर करा व त्यांना त्याबाबत अन्वेषण करण्यासाठी व सुधारणा करुन चुका दुरुस्त करण्यासाठी पुरेसा अवधी देत त्यांच्या प्रतिसादासाठी थांबण्याला....

४. .....धमकीची अजिबआत पर्वा न करता जनतेसाठी अहवाल उघड करण्याला.....

---

**८०. गेली काही वर्षे उद्योगांना प्रोत्साहन देणाऱ्या विभागाचे तुम्ही प्रमुख आहात आणि आतापर्यंत 'आम्ही गेली अनेक वर्षे हे करत होतो आणि उत्तम नफा मिळवत होतो आणि नुकसान टाळावे तर नजिकच्या भविष्यात आपण हीच प्रक्रिया चालू ठेवली पाहिजे' हा नियम होता. पण आता व्यवसाय चालवण्याचा कोणताही अनुभव नसलेले तरुण उद्योजक तुम्ही कधीही न ऐकलेल्या कल्पनांवर आधारित योजना घेवून तुमच्याकडे येत आहेत आणि अंशतः आर्थिक मदतीसाठी निवड करणे तुमच्यासाठी कठीण होत आहे. तुम्ही,**

१. या व्यक्ती संशोधनाधारित नव्या प्रक्रिया कशा रीतीने कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करत आहेत, समजाच्या नव्या वा बदलत्या गरजा हेरुन उत्पादन कसे रचतात, आणि त्यांच्या स्वप्नांना प्रत्यक्षात आण्यासाठी तंत्रज्ञानाचे कसे उपयोजन करुन राबवतात हे अभ्यासाल व नंतर आराखडे निवडाल.

२. उपलब्ध निधी जबाबदारीने हाताळावा अशी तुमच्याकडून अपेक्षा असल्याने गेली जवळपास पंचवीसाहून अधिक वर्षे ज्याप्रमाणे नियम पुस्तिकेच्या आधारे काम केले तसेच करुन सुरक्षित रहाल.

३. पुरेसा वेळ घेवून योजना विस्ताराने अभ्यासाल आणि त्या निवडण्यासाठी नवे लवचीक व विशिष्ट उद्योगाच्या ज्ञानयुगीन गरजा लक्षात घेवून नियम करण्यासाठी पुढाकार घ्याल.

४. राज्यात उद्योजकता प्रस्थापित करण्यासाठी जे नुकसानीची जोखीम हाताळण्यासाठी लागणाऱ्या धाडस वित्तासह सज्ज आहेत अशांच्या योजना निवडून त्यांना त्यांच्या नव्या कल्पनांवर प्रयोग करु द्याल.

राजमुद्रा अॅकॅडमी, लातूर

76. शैक्षणिक उपकरण म्हणून पडद्यांचे लाभ मागे पडून त्यापासूनच्या व्यसनांचा धोका आणि विकास खुंटणे वाढलेले आहे या निरीक्षणांशी माहिती तंत्रज्ञानाच्या अगदी जवळ असलेले लोक सहमत आहेत. पडदे हे व्यक्तिगत नियंत्रणाच्या पलीकडे गेलेले आहेत आणि विकसनशील मेंदूच्या समाधान केंद्रात ते स्वतःचे बस्तान मांडतात. जबाबदार पालक म्हणून तुम्ही .....

1. उच्च शाळेत पोहोचेपर्यंत मुलांना सेलफोन वापरु देणार नाही तसेच वाहन चालवताना त्याच्या वापरावर बंदी घालात आणि त्याच्या घरातील वापरावर कठोर मर्यादा घालाल.
2. मुलांच्यापुढे आदर्श ठेवण्यासाठी आत्यंतिक गरजेखेरीज घरी पडद्यांचा आणि महाजालाचा वापर करणार नाही.
3. भरपूर प्रमाणात दूरदर्शन पाहात तुम्ही मोठे झालेले असल्याने अपरिचिताबद्दल न घाबरता तुम्ही तुमच्या नुकत्याच चालू लागलेल्या मुलाला आयपॅडबरोबर खेळण्याची मोकळीक द्याल.
4. या समस्येशी व लाभांशी संबंधित अस्सल संशोधन अभ्यासून समंजसपणे प्रत्येक निर्णय घ्याल.

77. तरुण व्यक्ती म्हणून ओळख असून आपल्या लोकसंख्येचा 32% भाग असलेल्या, 10 ते 24 वयोगटातील मुलगे व मुली शारीरिक आणि संप्रेरकांमुळे होणारे बदल, बरोबरीच्यांचा दबाव, एकाकीपणा, शारीरिक आकर्षण, लैंगिक कुतूहल इत्यादींमुळे तणावाखाली असतात हे पाहण्यात आले आहे. याबरोबरीने सामाजिक माध्यमे, खाण्याच्या आरोग्याला हानीकारक सवयी, विविध प्रकारची व्यसने, निष्काळजीपणा इत्यादी त्यांच्या शारीरिक, भावनिक आणि सामाजिक स्वसास्थ्यावर परिणाम करतात. अनेक वेळा वैचारिक गोंधळ आणि वैफल्य त्यांना आत्महत्येकडे घेऊन जाते. एक जबाबदार डॉक्टर आणि आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी म्हणून तुम्ही ही मोहीम .......... प्राधान्य द्याल.

1. मुलींची तसेच मुलांची लग्नाच्या वयाची कायदेशीर मर्यादा कमी करण्याला
2. शैक्षणिक आणि सामुदायिक सामाजिक जबाबदारी घेणाऱ्या संस्थांच्या सहभागाने किशोरवयीन व्यक्तिस्नेही आरोग्य सेवा निर्माण करण्याला
3. तरुण व्यक्तींना विविध स्वरुपाची प्रदूषणे कमी करणे, परिस्थिती स्नेही जीवनशैली स्वीकारणे, जीवविघटनक्षम आणि ऊर्जाबाबत करणारी उत्पादने रचणे, अन्न, पाणी ऊर्जा यांच्या अपव्ययाला प्रतिबंध करणे इत्यादीसारख्या विधायक आणि आव्हानात्मक कृतींत गुंतवण्याला
4. सर्व संबंधितांना, तरुण व्यक्तींना आत्महत्येकडे लोटण्याची शक्यता असणाऱ्या वर्तनाबाबत दक्ष राहायला मदत देण्याला.

78. वाहतुक नियंत्रण विभागाच्या प्रशिक्षणार्थींना वाहतुक नियमांचे केल्याबद्दल घटनास्थळी शिक्षा करण्यासंबंधित निर्णय घ्यायला साहाय्य देण्याचा कार्यभार तुमच्याकडे सोपवलेला आहे. रात्रीच्यावेळी गस्तीवर असताना तुमच्या प्रशिक्षणार्थीला पाठचे दिवे नसलेली चारचाकी आढळली. प्रशिक्षणार्थीने चालकाला गाडी थांबवण्याचा हुकूम दिला आणि तपशीलात जाऊन चौकशी केली. तो स्वतःच संबंधित गाडीचा मालक आहे आणि स्वतःच्या जुळ्या मुलींच्या दर्जेदार शिक्षणाला पैसे साठवण्यासाठी तो दिवसा एक आणि पूर्वरात्री एक अशा दोन नोकऱ्या करतो व त्यामुळे सदर बाब त्याच्या लक्षात आली नाही असे चालकाने सांगितले. स्वतःच्या दाव्यांसंबंधातील सर्व दस्तावेजही त्याने दाखवले. प्रशिक्षणार्थीने त्याला बऱ्याच मोठ्या रकमेचा दंड देण्यास फर्मावले. मी जाणूनबजून नियम तोडलेला नाही आणि यापुढे मी काळजी घेईन असे चालक गयावया करुन विनवू लागला. प्रशिक्षणार्थीने तुम्हाला तोडगा सुचवण्याची विनंती केली आहे. तुम्ही सुचवाल.

1. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींना आपण नेहमीच विभागाने निर्धारित केलेला दंड केला पाहिजे कारण सुव्यवस्था राखणे हे आपले कर्तव्य आहे.
2. व्यक्ती गरजू वाटते म्हणुन तिला वाजवी रक्कम दंड म्हणून द्यायला सांगा आणि तो तिचा पहिला गुन्हा आहे म्हणून जाऊ द्याल.
3. त्याला काही वेळ न्यायालयीन कोठडीत ठेवून नंतर समज देऊन सोडून देणे ठीक होईल.
4. दुर्लक्ष होण्यासंबंधी चालकाकडे सबळ कारण असल्यामुळे त्याचं जगणं कठीण करण्याऐवजी त्याला कडक समज देऊन सोडून द्या.

79. एका आस्थापनाकडून "आस्थापनाची सामाजिक जबाबदारी" या योजनेअंतर्गत, जीवनाच्या सर्व पैलूंसंबंधात नवनिर्माण प्रस्थापित करण्यासाठी निधी देणाऱ्या कचेरीत प्रमुख म्हणून तुमची नेमणूक झाली आहे. तुमच्याकडे दोन मागण्या आल्या आहेत आणि त्यातील फक्त एकीची निवड तुम्हाला कराची आहे. नवोपक्रमित योग व्यवहार करुन लोकांना आध्यात्मिक होण्यासाठी धर्म, जात, किंवा पंथ यांच्या निरपेक्ष मदत देणे हे यातील एक संघटनेचे ध्येय आहे. या संघटनेची प्रमुख शहरातील प्रभावी नेत्याची गुरु आहे आणि तो नेता तुमच्यावर तिच्या मागणीची निवड करावी म्हणून दबाव आणत आहे. तरुण उद्योजकांच्या दुसऱ्या नवोपक्रमशील संघटनेला शहर स्वच्छ राखणाऱ्या सफाई सेवकांना देणारी उपकरणे विकसित करायची आहेत. त्यांची उपकरणे कर्मचाऱ्यांना स्वतः घाणेरडे न होता सर्व प्रकारची घाण हाताळायला मदत करतील व विविध रोगांना बळी जाण्यापासून वाचवतील अशी हमी संघटनेने काही प्रत्यक्षीकांसह दिलेली आहे.

1. समाजातील भ्रष्टाचार, अन्याय आणि पिळवणू यांचे निर्मूलन करण्यासंबंधात आध्यात्मिकतेने काही सकारात्मक भूमिका घेतली आहे असे आतापर्यंत तुमच्या पाहण्यात नसल्याने तुम्ही निर्णय घेणे लांबणीवर टाकाल.
2. या लोकांना आरोग्यपूर्ण व सन्मानाचे जीवन जगण्याचा हक्क आहे म्हणून अशा उपकरणांचे तातडीने विकसन करण्याची गरज असल्याने तुम्ही उद्योजकांच्या गटाला निधी द्याल.
3. दोघांनाही समाधानी ठेवण्यासाठी दोन्ही अर्जदारांना उपलब्ध निधी सारखा विभागून देण्यासाठी व्यवस्थापनाकडून खास परवानगी मिळवाल.

राजमुद्रा अॅकॅडमी, लातूर

4. शहरात या गुरुचे श्रीमंत असे अनेक शिष्य असल्याने आणि व्यापक समाजाच्या लाभासाठी ते चांगले काम करत असल्याचे त्यांचे मत असल्याने तुम्ही आध्यात्मिक संघटनेला निधी द्याल.

80. नुकतीच तुमची नेमणूक एका प्रभागातील झाडांची जोपासना व ओंडक्यांच्या अवैध वाहतुकीवरील बंदी यावर देखरेख करणाऱ्या विभागात झाली आहे. सार्वजनिक बसमधून प्रवास करताना तुम्हाला पुढच्या बाकावर बसलेल्या सहप्रवाशांचा संवाद ऐकण्याचा योग आला. ते तुमच्या आता राज्याच्या विभाग प्रमुखपदी बढती मिळालेल्या पूर्वाधिकाऱ्यांच्या कामाची स्तुती करत होते. त्यांच्या चर्चेनुसार तुमचे पूर्वाधिकारी खूप चांगली व्यक्ती आहे. त्यांनी कधीच लाच घेतली नाही आणि भागातील झाडे तोडल्याबद्दल कोणाही व्यक्तीविरुद्ध कार्यवाही केली नाही. अनेक प्रसंगी बेकायदेशीर वृक्षतोड करण्यावरही त्यांनी कधी आक्षेप घेतला नाही. तुम्ही,

1. संवादात सहभागी होऊन तुमच्या पूर्वाधिकाऱ्यांच्या लोकप्रियतेबाबत अधिक जाणून घ्याल व लोकांना समाधानी ठेवण्यासाठी तुमच्या डावपेचांचे नियोजन कराल.
2. संवादात सहभागी होऊन तुमचे पूर्वाधिकारी जरी चांगली व्यक्ती होते तरी त्यांनी त्यांचे कर्तव्य योग्य प्रकार पार पाडले नाही हे पटवून द्याल.
3. त्या भागातील शाळा व महाविद्यालयांच्या मदतीने लोकांच्या संबंधित कायद्याच्या आकलनासंबंधाने सर्वेक्षण कराल आणि लोकांना या कायद्याच्या महत्त्वाबाबत जागरुक करण्यासाठी उपक्रम कराल.
4. त्यांच्या वृक्षतोडीसंबंधीच्या कायद्यांच्या आकलनाची माहिती मिळवण्यासाठी संवादात सहभागी व्हाल आणि संबंधित कायद्यांच्या अंमलबजावणीचे तुमचे डावपेच रचाल.

## राज्यसेवा पूर्व परीक्षा - 2018

76. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे परीक्षण करताना एका गृह वसाहतीतील इमारतीवर तुम्हाला ITI चा भक्कम नामफलक आढळला. या केंद्राने संपूर्ण जागा व्यापली आहे असे हा फलक सुचवत होता. कोपऱ्यातल्या एक खोली असलेल्या जागेतून संस्था चालवली जात आहे हे संस्थेत तुम्हाला पाऊल ठेवताच आढळले. जेव्हा कचेरी आणि विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव घ्यायला साहाय्य देण्यासाठी अनिवार्य असलेल्या प्रयोगशाळेबाबत विचारणा केली, तेव्हा प्रभारी व्यक्तीने संस्थेची प्रयोगशाळा असल्याचा दावा करुन तुम्हाला तळमजल्यावरील स्कूटर दुरुस्ती गॅरेजमध्ये नेले. या व्यक्तीने तुम्हाला आदर्श ITI साठी आवश्यक असणाऱ्या प्रशस्त सुविधांची सर्व प्रमाणपत्रे दाखवली. तुम्ही :

1. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे नुकसान टाळावे, म्हणून संस्थेला मान्यता मिळवण्यासाठी कबूल केलेल्या भौतिक सुविधा तीन वर्षांच्या कालावधीत जुळवून आणण्यास सांगाल.
2. आवश्यक क्षमता प्राप्त केल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे मिळणे टाळण्यासाठी संस्थेची शासन मान्यता रद्द कराल.
3. काम मिळण्यासाठी आवश्यक अनुभवाधारित कौशल्ये प्राप्त करण्यासंबंधातील समस्या सोडवण्यासाठी आणि शैक्षणिक उपक्रमांचे नियमन करणारी समिती नेमण्यासाठी विद्यार्थी, पालक, अध्यापक आणि व्यवस्थापक यांची बैठक बोलवाल.
4. व्यवस्थापनाला अतिरिक्त शुल्क न लादता काम मिळवण्यासाठी आवश्यक असे प्रत्यक्ष अनुभव घ्यायला विद्यार्थ्यांना साहाय्य देण्यासाठी व्यवस्था करण्याचा आदेश द्याल.

77. तुम्ही विविध कामांसाठी माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान वापरण्याचे निर्णय घेण्यासाठी जबाबदार असणाऱ्या विभागाचे प्रमुख आहात. जरी तुमच्या हाताखालील बहुसंख्य लोक चलाख फोन्सचा (Smartphones) वापर करत असले तरी ते जनतेचे सेवक म्हणून त्यांच्या अडीअडचणींचा परिचय होण्यासाठी त्यांच्या संपर्कात असणे आवश्यक आहे. या बहाण्याखाली सामान्य नागरिकांना ऑनलाइन सेवा पुरवण्याच्या विरोधात आहेत. तुम्ही याच्याशी संबंधित त्यांच्या पळवाटांशी परिचित आहात. पण तरीही तुम्ही भ्रष्टाचार कमी करण्यासाठी, त्यांची शक्ती व पैसे वाचवण्यासाठी आणि लोकांना विविध स्वरुपाच्या छळापासून मुक्त करण्यासाठी जनतेला ऑनलाइन सेवा देण्याचा निर्धार केलेला आहे. तुम्ही ....

1. तुमच्या कनिष्ठांची मते विचारात न घेता तुमचे ध्येय गाठण्यासाठी आवश्यक असलेली सर्व व्यवस्था कराल.
2. पुढाकार घेऊन जनतेच्या सेवकांच्या अडमुठेपणामुळे तो द्याव्या लागणाऱ्या अडचणींबाबत संवेदनशील व्हायला तुमच्या हाताखालील लोकांना मदत द्याल.
3. सामान्य व्यक्तींना आपण पदाधिकाऱ्यांच्या दयेवर अवलंबून आहोत व त्याचा मोबदला आपण द्यायला हवा अशी भावना निर्माण करणाऱ्या प्रत्येकाला लेखी ताकीद द्याल.
4. बऱ्याच अनौपचारिक बैठकी घेऊन तुम्ही तुमच्या कनिष्ठांचे एक जबाबदार आणि प्रमाणिक जनता सेवक म्हणून सेवा देणारे मंडळ स्थापण्यासाठी प्रयत्नशील रहाल.

78. क्षणाचाही वेळ न लागता दंगली उसळणाऱ्या भागात व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याची कामगिरी तुमच्यावर आहे. या भागात रहाणाऱ्या एकाच धर्माच्या दोन पंथांत धार्मिक वास्तूच्या मालकीसंबंधाने वाद आहे. त्यापैकी मोठ्या संख्येने असलेले एका गटाचे सदस्य खूपच आक्रमक असून ते दुसऱ्या अल्पसंख्येने असलेल्या गटावर दादागिरी करु पाहतात. सकाळीच दादागटाने त्या जागेवर जबरदस्तीने मालकी मिळवली आणि याच्या परिणामी तेथील परिस्थिती गंभीर बनली. संख्येने अल्प असलेल्या गटाने या गटाविरोधात तक्रार नोंदवली. गुंतागुंत टाळून शांतता प्रस्थापित करण्यासाठी तुम्ही पोलिस अधिकाऱ्याला या गटाच्या नेत्याला अटक

राजमुद्रा अकॅडमी, लातूर

करण्याचा आदेश दिला. पोलीस पथक या नेत्याला बनावट चकमकीत ठार मारण्याचा प्रयत्न करत आहे, अशी त्या गटाच्या सदस्यांची समजूत झाली. सायंकाळी लाठ्या व पलिते घेतलेला मोठा जमाव ठाण्यावर हल्ला करुन नेत्याची सुटका करण्यासाठी चाल करुन येत आहे. तुम्ही;

1. जमाव आक्रमक असल्यामुळे तो ठाण्याची इमारत जाळण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता असल्याने पोलीस दलाला गोळीबार करण्यासाठी सज्ज रहाण्यास सांगाल.
2. कोणत्याही प्रकारे चकमक होणार नाही त्यांचा नेता सुरक्षित आहे याची जमावाला खात्री द्याल आणि काही सदस्यांना त्यांच्या नेत्याशी बोलण्याची विनंती कराल.
3. अटक केलेल्या नेत्याशी बोलून त्याने स्वतः तो सुरक्षित असून त्याच्या विरोधात पोलिसांनी कोणतीही तक्रार नोंदवली नसल्याचे घोषित करावे यासाठी त्याची समजूत घालाल.
4. त्या भागातील नगरसेवक, विधानसभा सदस्य, लोकसभा सदस्य यांना ही परिस्थिती हाताळण्यासाठी तुम्हाला मदत करण्याची विनंती करा.

79. तुम्ही शहराच्या प्रदूषण नियंत्रणावर देखरेख करणाऱ्या विभागाचे प्रमुख आहात. 'ग्लोबल (जागतिक) हवा 2017' अहवाल वाचताना तुमच्या लक्षात आले की भारतातील ओझोनशी संबंधित बालमृत्युंत वाढ होते आहे. तुम्ही ;

1. या समस्येबाबतची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी आवश्यक माहिती गोळा कराल आणि गरज असल्यास आरोग्य विभागाच्या सहकार्याने उपक्रम कार्यान्वित करण्याचा निर्णय घ्याल.
2. शहराच्या वाहतुक विभागाच्या साहाय्याने वाहन प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी भरवशांची सार्वजनिक वाहतुक पुरवण्याची योजना आखाल.
3. वाहन प्रदूषण नियंत्रणाची रणनीति आखण्याबरोबरीने शहरात तसेच शहराभोवती आढळणाऱ्या सर्व प्रकारच्या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची प्रणाली मिळवाल.
4. वाहतुक विभागाच्या मदतीने दर दिवशी रस्त्यावर येणारी वाहने नियंत्रित कराल आणि शहरापासून दूरवर असलेल्या ठिकाणी कचरा वाहून नेण्यासाठी उत्तम सेतुजाल संघटित कराल.

80. तुमच्या कचेरीत तुम्ही सर्वात उच्च पदावर आहात. तुमच्या हाताखालील दोन व्यक्तींना वेगवेगळ्या प्रसंगी कचेरीत येत असताना अपघात होऊन त्यांना किरकोळ दुखापतींना त्रास झाला. भविष्यात अशा प्रकारच्या दुर्दैवी अनुभवांना टाळण्यासाठी त्यांच्या संघटनेचा नेता तुमच्याकडे एका प्रसिद्ध वस्तु तज्ञाचा सल्ला घेऊन कचेरीच्या परिसरात योग्य ते बदल करुन घेण्याची विनंती करत आहे. या क्षेत्राच्या जलवायूमानाची (हवामानासंबंधीची) व भौगोलिक परिस्थितीची काळजी घेणाऱ्या वस्तुविद्याविशारदने (आर्किटेक्ट) हे माणूसस्नेही व पर्यावरण संवेदनशील परिसर रचले आहे.

1. तज्ञाचा सल्ला घेण्याची त्याची विनंती स्वीकाराल आणि भविष्यात अशा अपघातांमुळे खर्च वाचवाल.
2. या गोष्टींसंबंधातील सर्व कर्मचाऱ्यांच्या वृत्तीचा परिचय करुन घेण्यासाठी व त्याच्या विनंतीबाबत समंजसपणे निर्णय घ्यायला मदत देण्यासाठी त्यांची बैठक आयोजित कराल.
3. कर्मचाऱ्यांना वस्तुस्थितीचा परिचय करुन देऊन असे सल्ले निरुपयोगी असतात हे समजून घ्यायला मदत देणारी कार्यशाळा मालिका आयोजित कराल.
4. तुमचा अशा शास्त्रांवर विश्वास नसल्याने सांगत त्याची विनंती तत्काळ धुडकावून लावाल.

## राज्यसेवा पूर्व परीक्षा - 2017

76. पौगंडावस्थेत तुम्ही एक उत्साही ढोलवादक होता. व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्यात गुंतल्यामुळे आतापर्यंतच्या काही वर्षात तुम्ही तो वाजवलेला नाही. सध्या तुमच्याकडे ध्वनीप्रदूषणासह शहराच्या प्रदूषण समस्यांची सोडवणुक करण्याचा कार्यभार आहे. पुढच्या महिन्यात साजऱ्या होणाऱ्या उत्सवात ढोल वाजण्यासाठी व त्याचा सराव करण्याची परवानगी मागण्यासाठी तरुण व्यक्तींचा एक गट तुमच्याकडे आला आहे. त्याचप्रमाणे तरुण व्यक्तींचा दुसरा गट वैज्ञानिकरित्या गोळा केलेल्या पुराव्यांसह शहरातील ध्वनीप्रदूषणाची समस्या घेऊन तुमच्याकडे या पूर्वीच आलेला आहे. तुम्ही,

1. ढोल गटाला फक्त दिवसा सराव करण्याची व वाजवण्याची परवानगी द्याल आणि दुसऱ्या गटाला वर्षातील काही महिने ध्वनीप्रदूषण सहन करण्याची व त्या गटाला प्राचीन संस्कृतीचा प्रसार करु देण्याची विनंती कराल.
2. ढोल गटाला ध्वनीप्रदूषणाच्या समस्या समजून घ्यायला मदत देणारी व त्यांच्या पैसे कमावण्याच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्याची विनंती एखाद्या जबाबदार अशासकीय संघटनेला कराल.
3. आरोग्य खाते, पोलीस खाते आणि अशासकीय संस्था यांच्या सहभागाने काम करुन ध्वनीप्रदूषणाच्या समस्यांबाबत लोकजागृती करण्यासाठी मोहीम संघटित कराल.
4. दोन्ही गटांच्या नेत्यांची बैठक आयोजित करुन त्यांना संस्कृती रक्षण व ध्वनीप्रदूषणाला प्रतिबंध या दोन्ही समस्या मिटवण्यास सांगाल.

77. तुम्ही एका शासकीय संघटनेला सेवा देणाऱ्या रुग्णालयाचे प्रमुख आहात. एका कर्मचाऱ्याकडुन तुमच्याकडे लेखी तक्रार आली असून त्यात त्याने त्याचा घसा खूप दुखत आहे आणि गेले तीन दिवस त्याने घट्ट आहार घेतला असल्याचे लिहिले आहे. पुढे त्याने लिहिले आहे की

दोन कारणांमुळे त्याला योग्य सेवा मिळू शकलेली नाही; एक म्हणजे तो आरक्षित वर्गातील आहे आणि दुसरे म्हणजे तो कोणत्याही उच्च पदावर काम करत नाही. प्रमुख म्हणून या तक्रारीत काही तथ्य आहे हे तुम्हाला माहीत आहे. गोष्टी सरळ करण्यासाठी तुम्ही,

1. रुग्णाची चिकित्सा करुन त्याला पुढील उपचारांसाठी संबंधित विशेषज्ञाकडे सोपवून त्याचे समाधान होईपर्यंत त्यांचे पर्यवेक्षण कराल.
2. रुग्णाच्या आजाराच्या व तयाने केलेल्या आरोपांच्या गांभीर्याची चर्चा करण्यासाठी सहकाऱ्यांची व हाताखालील कर्मचाऱ्यांची बैठक आयोजित कराल.
3. या प्रश्नाला गांभीर्याने न घेण्याची रुग्णला विनंती कराल व वेळ मिळताच या समस्येत लक्ष घालण्याचे तयाला आश्वासन द्याल.
4. संबंधित डॉक्टरांना या तक्रारीत लक्ष घालण्यास व व्यक्तिगत पातळीवर समस्या मिटवण्यास सांगाल.

78. अलीकडेच तुम्ही लोकांनी स्वतःची तंबाखू व दारुची व्यसने सोडून आणि आरोग्यपूर्ण जीवन जगावे म्हणून स्वपुढाकाराने साहाय्य देण्यास सुरुवात केली आहे. लोक, मित्र, नातेवाईकांमुळे कुतूहलापोटी आणि आनंद मिळवण्यासाठी तंबाखू वा दारुचे व्यसन करतात असे तुम्हाला एक तिऱ्हाइत व्यक्ती म्हणुन नेहमीच वाटत होते. परंतु सफाई कर्मचारी म्हणून नोकरी करणारे बहुसंख्य लोक असह्य दुर्गंधी, घाण हाताळताना डोक्यात भरणारी शिसारी व सतत अनुभवावी लागणारी अस्वस्थता यांचा ताण व आजार यांचे व्यवस्थापन करण्यासाठी या सवयी लावून घेतात. यामुळे त्यांच्या त्रासाचा पुर्नविचार तुमही परभावाने केला. यापुढे तुम्ही,

1. या लोकांना त्यांची व्यसने सोडावी, म्हणून वळवण्याचा प्रयत्न करणार नाही.
2. त्यांचे जीवन चांगले करण्यासाइी त्यांना सध्या मिळत नसलेली आवश्यक उपकरणे मिळवून देण्यासाठी निधी गोळा कराल.
3. सर्वप्रकारच्या घाणीची विल्हेवाट लावण्यासंबंधाने व तिचे पुनःचक्रीकरण करण्यासंबंधाने संशोधन करुन या लोकांचे जीवनमान चांगले करण्यात प्रामाणिक रुचि असणाऱ्या व्यक्तींचा व संस्थांचा कृतिशील गट स्थापन कराल.
4. व्यावसायिक तज्ज्ञांच्या मदतीने या लोकांचे समुपदेशन करण्याची व्यवस्था कराल.

79. ग्रामीण भागातील लोकांना नवोपक्रम उपयुक्त ठरावेत आणि त्यांना चांगली शासकीय सेवा द्यावी हे ध्येय असलेल्या शासकीय मोहिमेचे तुम्ही प्रमुख आहात. तुम्हाला मदत करण्यासाठी व्यवस्थापन शाळांत शिकणाऱ्या अनेक तरुणांची भरती केलेली आहे. या व्यक्ती उत्साही आहेत, त्या चमकदार कल्पना मांडतात, तया तंत्रज्ञानाचे उत्तम आकलन असलेल्या, वाक्पटुत्व व संप्रेषण कौशल्यांचा वापर करुन आर्श्चचकित करणारी सादरीकरणे करणाऱ्या आणि दांडग्या आत्मविश्वासाने स्वतःचे म्हणणे मांडणाऱ्या आहेत. पण याचवेळी त्यांच्यापैकी बहुसंख्यांनी त्यांचे सर्व जीवन शहरात घालवल्यामुळे ते उत्तम सांपत्तिक स्थितीतील मध्यमवर्गीय कुटुंबांतील असल्याने, त्यांना विविध चणचणींसह व सामाजिक गंडांमुळे कसेबसे जीवन जगणाऱ्या लोकांच्या दैन्यावस्थेची फारच अल्प जाणीव आहे. ग्रामीण भागातील बहुसंख्य लोकांच्या जीवनांचे त्यांच्या संदर्भातील वास्तव अनुभवून त्याचे आकलन करुन घेण्यासाइी आणि त्यांना स्वतःचे जीवन चांगले बनवण्यासाठी पुढाकार घ्यायला मदत देण्यासाठी आवश्यक असणार धीर व चिकाटी यांचा या नवोदितांकडे अभाव आहे. तुम्ही,

1. ही मोहीम काही तरी विकण्यासाठी आणि लोकांना अनावश्यक सामान खरेदी करण्याचे व्यसनी बनवण्यासाठी नसून व त्यांनी ग्रामीण क्षेत्राच्या विविध भागांत लोकांच्या बरोबरीने काम करुन त्यांचे जीवन व आकांक्षा समजून घ्यायला हव्यात या वास्तवाचे भान या यायला त्यांना मदत द्याल.
2. उपलब्ध निधितील फार थोडा भाग वापरुन, त्यांना त्यांच्या कल्पनांवर काही आठवडे काम करुन द्याल आणि त्यांना त्यांच्या कल्पनांत शीघ्रनवता निर्माण करण्याची किंवा वास्तव आणि व्यवहार्य कल्पना अस्तित्वात आणण्याच्या संधी द्याल.
3. ग्रामीण भागातील लोकांना ते ज्या समाजाचे आहेत त्याच्या विकासासाठी एकत्र मिळून काम करण्यासाठी सक्षम करण्याचे रचनात्मक कार्य करण्याचा अनुभव असणाऱ्या संघटनांबरोबर या व्यक्तींसाठी क्षेत्रकार्यावर आधारित प्रशिक्षण आयोजित कराल.
4. तरुण साहाय्यकांच्या चांगल्या जगण्याच्या उच्चभ्रू कल्पनांत वेळ घालवण्यापेक्षा त्याच्या संबंधित अशी आसपासची कामे सोपवून, तुम्ही अनुभवी सहकाऱ्यांच्या मदतीने मोहीम यशस्वी करण्यासाठी वाटचाल कराल.

80. विविध राज्यांतील संस्थांच्या प्रमुखांसाठी कार्यशाळा आयोजित करण्याची जबाबदारी असलेल्या समितीचे तुम्ही एक सदस्य आहात. कार्यक्रमाची व कामाच्या वेळापत्रकाची रचना करत असताना, काही सदस्यांनी समितीने यजमान कचेरीला सर्व सदस्यांसाइी, त्या ठिकाणाहून 300 किमी अंतरावर असलेल्या प्रसिद्ध देवळाची भेट आयोजित करण्याची विनंती करावी, अशी सूचना केली आहे. तुम्ही,

1. या भेटीसाठी यजमान कचेरीशी संपर्क साधण्याची विनंती ही सूचना देणाऱ्या सदस्यांना कराल.
2. या मंदिर भेटीत रस असलेल्या सदस्यांना यजमान कचेरीतील व्यक्तींशी संपर्क साधून ही योजना आखण्याची विनंती कराल आणि तुम्हाला त्यात रस नसल्याचे सांगाल.
3. कार्यशाळेदरम्यान असे करणे हे विवेकाच्या विरोधात असल्याने कार्यशाळा संपल्यानंतर मंदिर भेट आयोजित करण्याची सुचना सदस्यांना कराल.
4. काही माहिती हक्क कार्यकर्त्यांना या कार्यशाहा कार्यक्रमाविषयीच्या माहितीत रस असल्याचे सांगून त्यांना अशी मागणी न करण्याची विनंती कराल.

राजमुद्रा अॅकडमी, लातूर

76. तुमच्या भागातील लोक संस्कृती व परंपरा यांच्या नावाखाली ध्वनी व हवा प्रदूषणासंबंधीत न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत नाहीत. सामान्य व्यक्ती म्हणुन तुम्ही,
   1. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या कृतीची माहिती प्रदूषण कमी करण्याच्या कामासाठी असलेल्या अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचत रहाल.
   2. न्यायालयीन आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींविरोधात तक्रार दाखल करत रहाल.
   3. जेव्हा लोकांच्या गटाशी बोलण्याची संधी मिळेल तेव्हा प्रदूषणामुळे होत असलेल्या आरोग्य समस्यांबाबतचे संदेश वितरित करत रहाल.
   4. प्रतिभासी व वास्तव कार्यक्रमांमार्फत ध्वनी व हवा प्रदूषण यांच्याशी आरोग्य समस्यांबाबत जागरुक होण्यासाठी लोकांना मदत करायला सुरुवात कराल.

77. तुम्ही एका संस्थेत अध्यापक व संशोधक म्हणुन काम करता आहात. तुम्ही सादर केलेल्या मागणीच्या आधारे मोठ्या ओद्योगिक गटाने दिलेल्या निधीतुन तुम्ही एका संशोधन प्रकल्पाचे प्रमुख म्हणुन काम पाहत आहात. या प्रकल्पात तुमच्या देखरेखीखाली अनेक कनिष्ठ संशोधक त्यांच्या डॉक्टरेट पदवीसाठी काम करत आहेत. एक स्त्री संशोधिका तुम्ही तिला पदवी मिळवून द्यावी अशी मागणी करत आहे. तुम्ही तिची मागणी पुर्ण केली नाही तर तुम्हाला लैंगिक छळाच्या बहाण्याखाली तुरुंगात टाकण्याची धमकी तिने दिलेली आहे.
   1. या विद्यार्थिनीकडुन होणारा छळ टाळण्यासाठी काही महिन्यांची रजा घ्या.
   2. या समस्येबाबत वरिष्ठांशी व सहकाऱ्यांशी चर्चा करुन या विद्यार्थिनीबाबत उपयुक्त कार्यवाही कराल.
   3. विद्यार्थिनीला दुसऱ्या मार्गदर्शकाबरोबर काम करण्याची व तिच्या इच्छेनुसार पदवी मिळवण्याची विनंती कराल.
   4. या विद्यार्थिनीला तिच्या संशोधन कार्याचे महत्त्व समजायला व ते पूर्ण करण्यासाठी धीर धरायला मदत देण्यासाठी तिच्या समुपदेशनाची व्यवस्था कराल.

78. तुम्ही जिल्हा अधिकारी आहात आणि तुमच्याकडे शिक्षण हक्काच्या कायद्यानुसार आपल्या मुलांना खाजगी शाळेत दाखल केलेल्या लोकांच्या गटाकडुन तक्रार आली आहे. हे पालक अल्पसंख्या, दलित व गरीब कुटुंबांतील आहेत. जरी शाळा व्यवस्थापनाने या मुलांना प्रवेश दिलेला असला तरी इतर मुले त्यांना छळतात. परिणामी ही लहान मुले शाळेत उपस्थित रहायला तयार नसतात. तुम्ही,
   1. पालकांना त्यांच्या मुलांना सरकारी शाळेत दाखल करण्याची विनंती कराल.
   2. छळवादींच्याविरोधात कडक कार्यवाही करावी अशी शाळा व्यवस्थापनाला विनंती कराल.
   3. फुरसतीच्या वेळेत शाळेतील मुलांसाठी कार्यसत्रे आयोजित करुन त्यांना एकमेकांचा विनाशर्त आदर करायला साहाय्य कराल.
   4. अ-शासकीय संघअनेच्या मदतीने अध्यापक पालकांसाठी कार्यसत्रे आयोजित करुन त्यांना शिक्षण हक्काचे महत्त्व समजून घ्यायला व विनाअट एकमेकांचा आदर विकसित करायला मदत द्याल.

79. पाच दिवसांच्या सुटीत तुम्ही ग्रामीण ठिकाणी राहणाऱ्या मित्राला भेटण्यासाठी आला आहात. भटकत असताना तुम्हाला वाटेत त्या भागातील विधानसभा सदस्याच्या व्यवस्थापनाखाली चालणारी निवासी आश्रम शाळा लागली. तुमचा मित्र हा विधानसभा सदस्य प्रमुख असलेल्या अन्य संस्थेचा कर्मचारी आहे. ही शाळा मुख्य रस्त्यापासून तसेच गावच्या वस्तीपासून दूर आहे. तुम्ही शाळेच्या आवारात गेलात आणि तुम्हाला शाळेच्या ओट्यावर सहा मुले बसलेली दिसली. इतर सर्व खोल्यांना टाळी लावली होती व आसपास कोणीही नव्हते. चौकशी केल्यावर तुम्हाला समजले की ती त्या शाळेची मुले असून ती त्यांच्या पालकांची त्यांना घरी घेऊन जाण्यासाठी वाट पाहत आहेत. ती मुले अन्नाशिवाय दोन दिवस आहेत. ही मुले लाजाळू असलेल्या कोरकू समाजातील असल्याने गाववाल्यांना भेटून त्यांच्यात मदत करण्याची विनंती करण्याचे धाडस नाही. तुमचा मित्र स्वतःच्या नोकरीची काळजी असल्याने तुम्हाला या मुलांना त्यांच्या नशीबावर सोडण्याची आणि आवारातून त्वरित बाहेर पडण्याची विनंती करत आहे. तुम्ही,
   1. गावकऱ्यांना बोलावून या मुलांची काळजी घेण्याची विनंती कराल आणि स्वतःला व मित्राला गुंतवून न घेता तरुणांच्या गटाला माध्यमांतील काही व्यक्तींना बोलावून या घटनेची कथा बनवण्यात पुढाकार घ्यायला मार्गदर्शन कराल.
   2. मित्राच्या नोकरीवर कोणत्याही स्वरुपात गदा येऊ नये म्हणुन गावकऱ्यांना बोलावून त्यांना या मुलांची दशा पाहण्यास सांगून त्यांना मुलांचे पालक येईपर्यंत तयाची काळजी घेण्याची विनंती कराल.
   3. तुम्हाला सुटीचा आनंद लुटायचा असल्याने तुम्ही गावकऱ्यांशी बोलून व त्यांना आवश्यक रक्कम सोपवून मुलांना अन्न देण्याची विनंती करुन ही घटना विसरुन जाल.
   4. गावकऱ्यांना मार्गदर्शन करुन त्यांच्यामार्फत सर्व शालेय कर्मचाऱ्यांना मुलांचे पालक त्यांना घेऊन जाईपर्यंत त्यांची काळजी घेण्यासाठी कामावर ताबडतोब रुजू व्हायला लावाल.

80. पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेश देण्यासाठी असलेल्या स्पर्धापरीक्षेला तुम्ही बसला आहात. अभ्यासक्रमाच्या जागांचे अर्जदारांच्या संख्येशी गुणोत्तर 1 : 256 आहे. तुम्हाला प्रवेश मिळेल अशी मोठी आशा आहे.
तुमच्या वर्गातील परीक्षा लिहिणाऱ्या काही विद्यार्थ्यांनी त्यांना इतरमार्गांचा अवलंब केल्यामुळे पकडले गेल्यामुळे पर्यवेक्षकाशी वाद घालायला सुरुवात केली. काही विद्यार्थ्यांनी या विद्यार्थ्यांविरुद्ध तक्रार केली आणि केंद्रप्रमुख समस्येची चौकशी करण्यासाठी आले आहेत. तुम्हाला उत्तरे लिहिण्यात एकाग्रता साधणे कठीण जात आहे. तुम्ही,
   1. परीक्षा गृहाबाहेर जाल आणि गोंधळ आणि लबाडीविरोधात निषेध कराल आणि व्यवस्थापनाला परीक्षा रद्द करण्याची विनंती कराल.
   2. शोध घेणाऱ्याला वर्गाबाहेर जाऊन चौकशी आणि विद्यार्थ्यांच्या लबाडीची तपासणी करण्याची विनंती कराल.

राजमुद्रा अकॅडमी, लातूर

3. गैरमार्गात गुंतलेल्या गटाच्या विद्यार्थ्यांचा निषेध करणाऱ्या विद्यार्थ्यांत सामील व्हाल, परीक्षा लिहिणे थांबवाल आणि शांतता हवी असण्याच्या तुमच्या हक्काची मागणी कराल.
4. फक्त स्वस्थ रहाल पेपरवर एकाग्रता साधाल आणि चौकशी पूर्ण होण्यासाइी थांबाल.

## राज्यसेवा पूर्व परीक्षा - 2015

76. तुमच्या भागात एक देऊळ आहे आणि अनेक भिन्न लिंगी व्यक्ती स्वतःच्या उपजीविकेसाठी येथे राहतात. त्यासाठी ते लोकांच्या मनात भीती निर्माण करुन पैसे उकळतात. विभागातील एक जबाबदार अधिकारी म्हणुन तुम्ही जिल्ह्यातील एका महाविद्यालयाच्या मनोविज्ञान विभागाला या समस्येचा अभ्यास करुन अहवाल तयार करायला सांगितला. या अहवालाच्या आधारे तुम्ही,
1. जबाबदार संस्थांशी, लोकांना या परिस्थितीबाबत जागरूक करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करण्यासंदर्भात संपर्क साधाल.
2. शैक्षणिक संस्थांच्या मदतीने या लोकांसाठी कौशल्य प्रशिक्षण उपक्रम आयोजित कराल.
3. तज्ञांच्या मदतीने या लोकांशी संपर्क साधून त्यांना कौशल्य प्राप्तीसाठी व स्वउद्योजक होण्यासाठी मदत कराल.
4. या लोकांच्या पुढाऱ्यांना भेटून लोकांच्या मनात अंधश्रद्धा निर्माण करणे थांबवा असे सांगाल.

77. तुमच्या कचेरीतील एक व्यक्ती वेगळ्या वंशाची असून आणखी एक व्यक्ती दुसऱ्या धर्माची आहे. तुमच्या सहकाऱ्यांचा एक गट या दोन्ही व्यक्तींची त्यांच्या दिसण्यावरुन, त्यांच्या पेहराव्यावरुन चेष्टा करतात व त्यांना अस्वस्थ करतात. यावर तुम्ही,
1. या गटात सहभागी होणार नाही आणि गप्प बसाल.
2. या गटाशी मैत्री कराल आणि हळू हळू त्यांना अशा चेष्टेमुळे व्यक्तीला काय वाटत असेल हे समजून घ्यायला मदत द्याल.
3. या दोन व्यक्तींशी मैत्री कराल आणि त्यांना भावनिक आधार द्याल आणि त्यांना काही अतिरेकी पाऊल टाकण्यापासून वाचवाल.
4. तुमच्या वरिष्ठांना या गटाला इतर व्यक्तींबरोबर सहानुभूतीपूर्ण वागायला मदत देण्यासाठी कार्यक्रम आयोजित करण्याची विनंती कराल.

78. तुम्ही अशा भागात वसतीला आहात की जेथे पुढारी आणि गुंड यांनी संबंधित नागरी अधिकाऱ्यावर दबाव आणून अवैध बांधकाम केले आहे व फेरीवाले बसवले आहेत. जेव्हा तक्रार दाखल करण्याकरता, तुम्ही हे काम पाहात असलेल्या अधिकाऱ्याकडे गेलात तेव्हा तीने तुम्हाला सांगितले की तिला कोणतेही संरक्षण नसल्याने ती या लोकांविरोधात कोणतीही कृती करु शकत नाही. तीने तुम्हाला असेही सांगितले की बहुधा शासन अशा अवैध कामांचे कायद्यात बदल करुन त्यांचे कायदेशीर कामांत रुपांतर करते. तुम्ही यावर,
1. या अधिकाऱ्याच्या कारणे दाखवून कृती न करण्याचा निषेध करण्यासाठी त्याच्या तोंडाला काळे फासाल.
2. सरकारच्या, खाजगी मालकीच्या जमिनीवरील अवैध बांधकामाला व फेरीवाल्यांना संरक्षण देण्याच्या पद्धतीला विरोध दर्शवणारे लेख व व्यंगचित्रे स्थानिक वृत्तपत्रांतून व सामाजिक माध्यमांतून प्रसारित कराल.
3. गुंड, पुढारी आणि अवैध कामांतून लाभ घेणाऱ्या लोकांच्या अभद्र युतीच्या व स्वतःच्या जबाबदाऱ्या पार पाडायला तयार नसलेल्या अधिकाऱ्यांच्या विरोधात दबावगट संघटित कराल.
4. परिस्थितीमुळे हताश होऊन स्वतः योग्य वर्गात दाखल व्हाल व भोवतालच्या अंदाधुंदीची काळजी करणे सोडून द्याल.

79. तुम्ही व तुमच्या मैत्रिणीने एका प्रतिष्ठेच्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला आहे आणि तुम्हा दोघांपैकी एकीची निवड करण्यासाठी दोघांनाही मुलाखतीला निमंत्रित केले आहे. ही शिष्यवृत्ती म्हणजे तुमच्या ज्ञानभाषक क्षामतेचे निर्देशन आहे. तुमची मैत्रिण ही तुमच्याइतकीच सक्षम आहे. ती वंचित समूहातुन आलेली असून या पायरीला पोहोचण्यासाठी तिने आणि तिच्या कुटुंबाने खूप कष्ट घेतले आहेत. या शिष्यवृत्तीची तिला खूपच गरज आहे आणि तरच तिला अभ्यास सुरु ठेवता येईल.
1. तुम्ही मुलाखतीला जाणार नाही आणि तुमच्या मैत्रिणीना शिष्यवृत्ती मिळू द्याल.
2. तुम्ही मुलाखतीला जाल आणि जर तुमची निवड झाली तर समितीला तुमच्या मैत्रिणीला शिष्यवृत्ती देण्याची विनंती कराल.
3. जर तुमची निवड झाली तर शिष्यवृत्ती स्वीकाराल आणि तुमच्या मैत्रिणीला आर्थिक मदत द्याल.
4. जर निवड झाली तर दोन्ही व्यक्तींना पारितोषिकात, सहभागी करु द्यावे अशी विनंती कराल. आणि मैत्रिणीना गरज असल्यास आर्थिक मदत कराल.

80. विभागाचे जिल्हाधिकारी म्हणून तुमच्याकडे विशीतील मुलांनी स्त्रियांची छेड काढल्याच्या अनेक तक्रारी समाजातील अनेक गटांकडून आल्या आहेत. तुम्हाला माहीत आहे की शाळा व महाविद्यालये पौगंडावस्थेतील विद्यार्थ्यांना अशा कोणत्याही अध्ययन उपक्रमात गुंतवत नाहीत की ज्यामुळे त्यांची ऊर्जा व्यक्तिगत परिपूर्तीचे समाधान देणाऱ्या, समाजाच्या दृष्टीने उपयुक्त असणाऱ्या, ज्यातून सर्जक व बौद्धिक कामाची मागणी होते अशा ठिकाणी प्रवाहित होईल. अनेक किशोरवयीन विद्यार्थी हे शाळा व महाविद्यालयांच्या बाहेर आहेत आणि ते कोणत्याही परिश्रमांशिवाय धनवान व ऐषोरामी जीवनाची स्वप्ने पाहत असतात. यावर तुम्ही कोणता उपाय करण्याला प्राधान्य द्याल?
1. जेथे हा त्रास जास्त आहे तेथे पोलीस संरक्षणाची व्यवस्था कराल.
2. या छेड काढणाऱ्यांच्या गट बैठकी आयोजित करुन, त्यांना त्यांचा गट संघटित करायला मदत देऊन, विविध युवा योजनांच्या सहाय्याने विभागातील विधेयक कामांत गुंतून जायला सहाय्य कराल.

राजमुद्रा अॅकॅडमी, लातूर

3. निवडक गैर-शासकीय संघटनांना विनंती करुन स्त्रियां व मुलींची छेड काढणाऱ्यांना विधायक सामाजिक कार्यात सहभागी करुन द्यायला सांगाल.
4. स्त्रिया व मुलींना उचित पेहराव घालण्याची सूचना द्याल.

## उत्तरसुची - 2015

## राज्यसेवा पूर्व परीक्षा - 2014

76. चालण्याचा मार्गासह एक बाग तुमच्या भागात आहे. परंतु ती धुम्रपान व मद्यपान करणाऱ्या लोकांनी व्यापलेली असते त्यामुळे मुलांना तेथे खेळणे जवळपास अशक्य असते. तुम्ही यावर :
   1. स्वतःच्या मुलांना तेथे नेणे थांबवाल.
   2. आवश्यक कार्यवाहीसाठी पोलिसांकडे जाल.
   3. सर्व पालकांच्यावतीने त्या लोकांना ती बाग सोडून जाण्यास सांगाल.
   4. या लोकांविरोधात कृती करण्यासाठी दबावगट तयार कराल.

77. जिल्ह्यात बऱ्यापैकी क्षमता असलेली लघुसिंचन प्रकल्प विकसीत करण्यासाठी दोन स्थळे आहेत. सिंचन विभागाचे प्रमुख म्हणुन शासनाने तुम्हास योग्य स्थळ सूचित करण्यास सांगितले, जेणेकरुन न्याय आणि सर्वसमावेशक विकासाचे ध्येय साध्य करता येईल.

| | स्थळ I | | स्थळ II |
|---|---|---|---|
| अ) | या स्थळला नैसर्गिक प्राधान्य असून धरणाकरिता कमी खर्च येईल. | अ) | पाण्याचा पुरेसा स्रोत उपलब्ध असला तरी बांधकाम महागडे होईल व स्थळ क्रमांक 01 पेक्षा 75% जादा खर्च येईल. |
| ब) | फायदा मिळणारी बरीचशी लोकसंख्या मोठे प्रगतीशील शेतकरी आहेत ज्यामुळे सकल राज्य उत्पादकतेत आणि कृषि उत्पादनात भर पडेल. | ब) | बहुतांश लोकसंख्या आदिवासी लहान व अतिलहान शेतकरी असून सिंचन सुविधेचा वापर करुन स्वतःची आर्थिक परिस्थिती विकसीत करण्याची त्यांची प्रचंड इच्छा आहे. |
| क) | येथील सधन शेतकऱ्यांनी नगदी पिकाचे उत्पादनासाठी भूजलाचा प्रचंड वापर केल्याने भूजल पातळी खालावली आहे व या शेतकऱ्यांना दाळी व कडधान्ये उत्पादनात अजिबात रस नाही. खरे तर या भागातील अन्न धान्याची गरज भागविण्यासाठी बाहेरुन धान्य आयात करावे लागते. | क) | जरी लाभ क्षेत्रातील जमीन अतिशय सुपीक आहे आणि एकदा पाणी आले की उत्पादकता वाढीची प्रचंड क्षमता असली तरी शेतकरी त्यांच्या गरीबीमुळे आणि तांत्रिक मार्गदर्शनाच्या अभावामुळे धराणाचा पुरेपुर वापर करण्यास कदाचित असमर्थ ठरतील. |

योजनेतील सिमीत आर्थिक स्रोत उपलब्धता पाहता केवळ एकच धरण तूर्त शक्य आहे. वरील परिस्थितीत खालीलपैकी कोणता पर्याय सर्वात योग्य म्हणून तुम्ही शासनास शिफारस करुन पाठवाल.
   1. स्थळ I खाली नमूद (अ) व (ब) कारणाकरिता स्थळ क्रमांक I ची शिफारस करणार.
   2. स्थळ I खाली नमूद (क) कारणाकरिता स्थळ क्रमांक I ची शिफारस करणार नाही.
   3. स्थळ II खाली नमूद (ब), कारणाकरिता स्थळ क्रमांक II ची शिफारस करणार.
   4. स्थळ II खाली नमूद (अ) व (क) कारणाकरिता स्थळ क्रमांक II ची शिफारस करणार नाही.

78. शासनाने दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची यादी तयार केली. अशा दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना दरमहा रुपये 2 प्रति किलो या अनुदानित दराने 35 किलो अन्नधान्य उपलब्ध केले जाते. एका जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याचे निदर्शनास आले की, त्याचे जिल्ह्यातील जवळपास 20% कुटुंबे जी शासन निकषाप्रमाणे खरोखरच गरीब आहेत ती दारिद्र्य रेषेच्या यादीत नाहीत, तर मोठ्या संख्येने जी कुटुंबे खरोखरच गरीब नाहीत त्यांची नावे यादीत असून ती गैरफायदा घेत आहेत. शासनाने जिल्हाधिकऱ्यांची खऱ्याखुऱ्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना यादीत अंतर्भूत करण्याची मागणी अमान्य केली, परंतु शासनाने असे निर्देश दिलेत की अवैध फायदा घेणाऱ्या कुटुंबाची नावे यादीततून वगळावी. वरल परिस्थिती तुम्ही जिल्हाधिकाऱ्याचे जागी असता तर कोणता मार्ग चोखाळला असता?
   1. खोट्या दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींची नावे यादीतून कमी करण्याची प्रभावी मोहीम राबवून अशा यादीतून काढून टाकलेल्यांच्या जागी किमान तेवढ्याच खऱ्याखुऱ्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची नावे अंतर्भूत करण्याची परवानगी शासनास मागितली असती.
   2. खऱ्याखुऱ्या गरीब कुटुंबाच हितासाठी शासनाने धोरण सुधारावे यास्तव विधायक दबाव आणण्यासाठी वृत्तपत्रे व माध्यमांना माहिती देवून एक मोहीम राबविली असती.
   3. प्रति कुटुंब 35 किलो ऐवजी 20 किलो स्वस्त धान्य देवून असे 10 किलो वाचलेले धान्य यादीत नसलेल्या दारिद्र्य रेषाखालील कुटुंबाकडे वळते केले असते.
   4. खऱ्याखुऱ्या गरीब कुटुंबाना प्रांजळणे सांगितले असते की, जरी त्यांना मदत करायची मनापासून इच्छा असली तरी शासन आदेशाचे त्यांचे हात बांधले गेले आहेत.

79. तुमच्या विभागातील राजकीय नेत्यांपैकी एक नेता असंघटित मजुरांचे आंदोलन आयोजित करत आहे. तुमचा अनुभव असा आहे की अशा प्रकारच्या आंदोलनात एक अदूरदर्शी लाभांसाठी सार्वजनिक व खाजगी मालमत्तेचा विध्वंस करतात आणि विविध संस्थांनी अनेक वर्षे वाढवलेली झाडे जाळतात वा कापतात. या क्षेत्रातील एक नागरिक या नात्याने हा

राजमुद्रा अॅकॅडमी, लातूर

विध्वंस थांबवण्यासाठी तुम्ही पुढीलपैकी काय कराल?

1. वसाहतीतील लोकांना हस्तपत्रे वाटून त्यांची सभा बोलवाल व एक अनौपचारिक संघटन तयार कराल. जिल्हाधिकाऱ्यांना हा विध्वंस टाळण्यासाठी या संघटनेच्या मदतीने की तजवीज करण्याची विनंती कराल.
2. विद्यार्थ्यांना या विध्वंसाबाबत जागृत करण्याची विनंती सर्व शैक्षणिक संस्थांना कराल.
3. तुमच्या भागातील शैक्षणिक संस्थाच्या परवानगीने त्यांना विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या समस्यांशी, आंदोलकांच्या समस्यांशी संबंधित प्रकल्प घ्यायला आणि त्यांच्या मागण्यांना पाठिंबा देणाऱ्या व विध्वंस टाळणाऱ्या कृती आयोजित करुन यात सहभागी व्हायला मदत द्याल.
4. आंतरजाल सुविधा वापरुन दबावगट तयार करा व समूह म्हणून संबंधित नेत्याशी समस्येसंबंधाने चर्चा कराल.

80. अमेरीकेच्या राष्ट्रपतींनी पहिला मानव चंद्रावर नेणाऱ्या अपोलो मोहिमेच्या तयारीच्या स्थळाच्या अंतिम क्षणाची तयारी तपासण्यासाठी भेट दिली. राष्ट्रपतींनी त्यावेळी तेथील परिसराची सफाई करीत असलेल्या कर्मचाऱ्याला, 'तू काय करतो आहेतस'? सफाई कर्मचारी तात्काळ उत्तरला, "मी पहिला मानव चंद्रावर पाठविण्याच्या मोहिमेत योगदान करतो आहे."

तुम्ही त्याक्षणी राष्ट्रपतीच्या जागी असता तर तुम्ही सफाई कामगाराच्या उत्तराचे मुल्यांकन कसे केले असते?

1. आपला व्यवसाय दुसऱ्याला कितीही हीन वाटला तरी त्याचे मुल्य जपणारी ही व्यक्ती आहे.
2. प्रकल्पात स्वतःचा नगण्य दर्जा विसरुन आपल्या देशाकडुन कार्यान्वित होत असलेल्या युगप्रवर्तक मोहिमेचा त्याला सार्थ अभिमान आहे.
3. त्याने मोठ्या खुबीने राष्ट्रपतीच्या लक्षात "श्रमाची प्रतिष्ठा" आणली.
4. ज्या ऐतिहासिक मोहिमेशी कोणताही संबंध नाही त्याचे अनावश्यक श्रेय घेण्याचा गृहस्थ प्रयत्न करीत आहे.



74. एका सुस्थापित उद्योजकाच्या पतनीने प्रशासकीय अधिकारी म्हणुन तुमच्याकडे दोन मुली असल्यामुळे छळ होत असल्याची तक्रार केली आहे. स्वतःच्या आईवडिलांची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने ते तिला याबाबतीत मदत करु शकत नाहीत असेही तिने तुम्हाला सांगितले आहे. तुम्ही काय कराल?

1. पत्नीचे समुपदेशन करुन तिला परिस्थितीशी सामना करण्यासाठी सक्षम कराल व परिणाम पाहण्यासाठी थांबाल.
2. या जोडप्यासाठी समुदपदेशन सत्रांची व्यवस्था कराल.
3. तिला संबंधित विभागाकडे तक्रार नोंदविण्यास सांगाल.
4. पत्नीला सामाजिक सेतुजालातुन नवऱ्याचे वर्तन जाहीर करण्यास सांगाल.

75. परिस्थिती : शासनाने राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाकडे स्वच्छतालय असावे यासाइी धोरण निश्चीत केले आहे, कारण बहुतांशी रोगराई आणि साथरोग मनुष्यप्राण्याच्या विष्ठेत आढळुन येणारे ई-कोली जंतू पाण्यात मिसहुन ते दुषित झाल्याने होत असतात. या रोगांमुळे जीवितहानी, वाया जाणारे मनुष्यदिवस आणि रोजगार हानी तसेच औषधोपचारासाठी होणारा खर्च प्रचंड असतो. महिलांची होणारी कुचंबणा ही एक महत्त्वाची बाब आहेच. जीवनाचा अधिकार म्हणजे प्रतिष्ठेने जगणे असे सर्वोच्च न्यायालयही म्हणते. त्याचप्रमाणे गावातील पर्यावरणही दुषित होते. वस्तुतः मनुष्यविष्ठा शास्त्रोक्त पद्धतीने हाताळण्यास तो सेंद्रिय खताचा एक महत्त्वाचा स्त्रोत आहे.

असे असतानाही आणि शौचालय न वापरण्याचे गंभीर परिणाम होत असुनही शैचालय असणाऱ्या राज्यातील ग्रामीण कुटुंबाची संख्या 60 टक्के आहे व 60 टक्क्यांपेकी 50 टक्के त्याचा प्रत्यक्ष वापर करतात. या अपयशाचे कारण जे सांगितले जाते ते असे की, शासनाचे शौचालय बांधकाम धोरण हे "बांधकाम प्रणित" असुन त्यामध्ये शौचालयाचा वापर न केल्यामुहे प्रखर लोकशिक्षण अभियानाची आज नितांत आवश्यकता आहे असे वाटते.

प्रश्न : जर तुम्हाला अशा लोक जागृती अभियानाचा ढाचा तयार करण्यास सांगितल्यास त्यामध्ये प्राधान्यक्रमानुसार आपण कोणते संदेश अंतर्भूत कराल.

अ) शौचालयाच्या नियमीत वापरामुळे उघड्यावर शौचास बसल्यामुळे आरोग्यावरील होणारे घातक परिणाम कमी होतील.
ब) गावातील स्वच्छ वातावरण टिकवुन ठेवता येईल.
क) मानवी प्रतिष्ठा, विशेषतः महिलांची प्रतिष्ठा राखता येईल.
ड) कृषी उत्पादकता व अथ्रव्यवस्थेला उभारी मिळेल.

1. अ, ब, क, ड
2. अ, क, ब, ड
3. ब, क, अ, ड
4. ड, ब, क, अ

76. शासन प्रतिनिधी व समिती सदस्य म्हणुन दोन वर्षाची सरकारी शिष्यवृत्ती देण्यासाइी तरुण कलाकारांची निवड करण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. बरेच प्रस्थ असलेला एक मान्यवर कलाकारही तज्ज्ञ म्हणुन या समितीचा सदस्य आहे. या प्रतिष्ठेच्या शिष्यवृत्तीसाठीची मर्यादित यादी अभ्यासताना समितीच्या दुसऱ्या एका सदस्याने तुमच्या लक्षात आणून

राजमुद्रा अॅकॅडमी, लातूर

दिले की अनेक कलाकार हे या मान्यवर कलाकाराच्या संस्थेतील आहेत वा त्याच्या माजी विद्यार्थ्यांच्या संस्थांतील आहेत. तुम्ही काय कराल?

1. कलाकाराशी बोलाल व अंतिम निवड भेदभावरहीत होण्यासाठी त्यांना निवडीचे निकष जाहीर करण्याची विनंती कराल.
2. या वर्षीच्या शिष्यवृत्ती मिळालेल्यांबाबत गप्प रहाल व नंतर या व्यक्तीची गैरकृत्ये जाहीर कराल.
3. समिती तत्काळ रद्द ठरवून तिचे काम थांबवून नव्या समितीची रचना कराल.
4. सध्याच्या समितीच्या सत्र सदस्यांना मर्यादित यादी करण्यासाठी वापरलेल्या मूळ यादीचा पुन:विचार करुन, भेदभाव होणार नाही अशी काळजी घेऊन, नवी मर्यादित यादी विकसित करण्याची विनंती कराल.

77. तुम्ही जातीयदृष्ट्या संवेदनशील भागाचे प्रशासकीय प्रमुख आहात. दोन वेगवेगळ्या जातीच्या प्रमुख व्यक्ती प्रक्षोभक भाषणे देऊन आपापल्या जातीतील लोकांमध्ये असंतोष पसरवत आहेत. अशा वेळी तुम्ही.

1. दोन्ही जातीय प्रमुखांना अटक करण्याचे तात्काळ आदेश द्याल.
2. दोन्ही जातीय प्रमुखांना बोलावून त्याच्यांमध्ये शांततेची बोलणी सुरु कराल.
3. दोन्ही जातीय प्रमुखांना वेगवेगळे बोलावून त्यांना विनयपूर्वक शब्दांत समजवाल.
4. हे प्रकरण वरिष्ठांकडे पाठवून पुढील आदेशाची वाट बघाल.

78. परिस्थिती : 1973 सालचा भीषण दुष्काळ आणि वर्ष 2012-13 मध्ये जाणवत असलेला दुष्काळ यामध्ये एक मुलभूत फरक असा की, 1973 सालच्या दुष्काळात अन्नधान्याची टंचाई मोठ्या प्रमाणावर होती तर 2012-13 मध्ये पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. हजारो खेड्यांना योग्य प्रतीचे सोडाच, परंतु किमान आवश्यक तेढे पिण्याचे पाणी सुद्धा उपलब्ध नाही. बरीच रब्बी पिके जमिनीत ओलावा नसल्याने पेरताच आलेली नाहीत. जेथे थोडे बहुत पाणी उपलब्ध आहे तेथेही नायट्रेड, फ्लोराईड सारख्या रसायानिक प्रदुषणामुळे ते पिण्यास वापरल्यास त्यातुन आरोग्याचे गंभीर प्रश्न निर्माण होतील. मान्सुन सुरु होईपर्यंत कसेही करुन मानवी जीवन वाचविणे हीच मुख्य काळजी आहे.

प्रश्न : अशा परिस्थितीत ही तातडीची परिस्थिती हाताळण्याची जबाबदारी आपणावर आल्यास खालीलपैकी कुठली उपाययोजना आपण प्राधान्याने अमलात आणाल.

अ) सर्व सार्वजनिक आणि खाजगी पाणी साठे फक्त पिण्याकरिता राखुन ठेवणे.

ब) शेतकऱ्यांच्या रब्बीचे पिक वाया जावून त्यांचे उत्पन्न बुडू नये, तसेच पिण्याच्या पाण्याची गरज सुद्धा भागविली जावी म्हणुन उपलब्ध पाणी या दोन्ही बाबींसाठी 50-50 टक्के वाटप नियोजन करणे.

क) गरीब शेतकऱ्यांचे उत्पादनाचे एकमेव स्त्रोत संपुष्टात येणार असल्याने आणि त्यांचे गंभीर आर्थिक परिणाम पाहता अन्न उत्पादनाला प्राधान्य देवून प्रथम आवश्यक तेवढे पाणी शेतीकरिता राखीव करणे.

ड) पाण्याचे दुर्भिक्ष लक्षात घेऊन आणि दुसरा कोणताही पर्याय नसल्याने रासायनिक प्रदुषित पाणी सुद्धा त्यामुळे होणारे आरोगयावरील दुष्परिणाम विचारात घेऊनही, मान्सुन सुरु होईपर्यंत वापरण्याला प्रोत्साहन देणे, कारण मानवी जीव किमान टिकल्यास अशा रोगावर कालांतराने यथायोग्य उपचार करता येईल.

| | |
|---|---|
| 1. ड | 2. ब |
| 3. अ | 4. क |

79. तुमच्या मित्राने त्याचे दुकान एका दुकानदाराला भाड्याने दिले आणि त्या दुकानदाराने मागील एक वर्षापासून भाडे दिलेले नाही व आता तो दुकान रिकामेही करण्यास नकार देत आहे. दुकानदाराने तुमच्या मित्रास दुकान विकत देण्याची मागणी केली आहे परंतु दुकानदाराची खरेदी किंमत बाजार भावाच्या 50% आहे. दुकानदाराने त्यांच्या ओळखीचा वापर करुन पोलीसाकडे जाऊ नये म्हणुन तुमच्या मित्राला धमकावले आहे. अशा परिस्थितीत तुम्ही एक पोलीस अधिकारी म्हणुन कोणता सल्ला द्याल?

1. पोलीसाकडे दुकानदाराच्या विरोधात तक्रार नोंदविणे.
2. दुकानदाराने सुचविलेल्या खरेदी किंमतीत वाढ करावयास सांगणे.
3. तुमच्या अधिकाराचा वापर करुन दुकानदारास धमकी द्याल.
4. तिसऱ्या व्यक्तीला दुकान विकण्याचा प्रयत्न करावा जेथे किंमत बाजार भावापेक्षा थोडी कमी परंतु दुकानदाराच्या खरेदी किमतीपेक्षा अधिक आहे.

80. तुम्ही लोकसेवा आयोगाच्या मुलाखतीसाठी जात आहात. रस्त्यात झालेल्या अपघातात काही माणसे अडकलेली तुम्हाला दिसतात. अशा वेळी तुम्ही काय कराल?

1. तुम्ही अपघाताकडे लक्ष न देता मुलाखतीच्या ठिकाणी पोहोचाल.
2. हॉस्पिटल आणि पोलीस स्टेशनला अपघाताबाबत टेलीफोनवरुन माहिती द्याल.
3. पोलीस व ॲम्ब्यूलन्सची मदत मागवाल व ती येईपर्यंत तिथे थांबाल.
4. पोलीस व ॲम्ब्यूलन्सला मदत करावयास सांगून अपघातात अडकलेल्या स्थानिकांना सोडवाल.

राजमुद्रा अॅकॅडमी, लातूर

# Answer Key & Solution

## MPSC C-SAT 2023

| प्र.क्र | संच - A | | | |
|---|---|---|---|---|
| | पर्याय क्रमांक व गुण | | | |
| | 1 | 2 | 3 | 4 |
| 76 | 1 | 2.5 | 1.5 | 0 |
| 77 | 1 | 2.5 | 1.5 | 0 |
| 78 | 1.5 | 0 | 1 | 2.5 |
| 79 | 1 | 0 | 2.5 | 1.5 |
| 80 | 0 | 1.5 | 1 | 2.5 |

## MPSC C-SAT 2022

| संच - B | | | |
|---|---|---|---|
| पर्याय क्रमांक व गुण | | | |
| 1 | 2 | 3 | 4 |
| 2.5 | 0 | 1 | 1.5 |
| 1.5 | 1 | 0 | 2.5 |
| 1.5 | 1 | 2.5 | 0 |
| 0 | 1 | 2.5 | 1.5 |
| 0 | 1 | 1.5 | 2.5 |

### MPSC - Prelims - 2021 - CSAT Paper -2

| प्र.क्र. | संच – A | | | |
|---|---|---|---|---|
| | पर्याय क्रमांक व गुण | | | |
| | १ | २ | ३ | ४ |
| 76 | 1.5 | 1 | 0 | 2.5 |
| 77 | 1 | 1.5 | 2.5 | 0 |
| 78 | 0 | 1 | 1.5 | 2.5 |
| 79 | 0 | 1.5 | 1 | 2.5 |
| 80 | 0 | 1 | 1.5 | 2.5 |

### MPSC - Prelims - 2020 - CSAT Paper -2

| प्र.क्र. | संच – A | | | |
|---|---|---|---|---|
| | पर्याय क्रमांक व गुण | | | |
| | १ | २ | ३ | ४ |
| 76 | 2.5 | 1.5 | 1 | 0 |
| 77 | 1.5 | 0 | 1 | 2.5 |
| 78 | 2.5 | 1 | 1.5 | 0 |
| 79 | 1.5 | 1 | 2.5 | 0 |
| 80 | 2.5 | 0 | 1.5 | 1 |

राजमुद्रा अॅकॅडमी, लातूर

### राज्यसेवा पूर्व परीक्षा - 2019

### उत्तरसुची - 2019

प्रश्न क्र. पर्याय क्र. व गुण

| | 1 | 2 | 3 | 4 |
|---|---|---|---|---|
| 76 | 1 | 1.5 | 0 | 2.5 |
| 77 | 0 | 2.5 | 1.5 | 1 |
| 78 | 0 | 1.5 | 1 | 2.5 |
| 79 | 0 | 2.5 | 1 | 1.5 |
| 80 | 1 | 0 | 2.5 | 1.5 |

## राज्यसेवा पूर्व परीक्षा - 2018

### उत्तरसुची - 2018

प्रश्न क्र. पर्याय क्र. व गुण

| | 1 | 2 | 3 | 4 |
|---|---|---|---|---|
| 76 | 1 | 0 | 2.5 | 1.5 |
| 77 | 1 | 1.5 | 0 | 2.5 |
| 78 | 0 | 1.5 | 2.5 | 1 |
| 79 | 0 | 2.5 | 1.5 | 1 |
| 80 | 0 | 1.5 | 2.5 | 1 |

## राज्यसेवा पूर्व परीक्षा - 2017

### उत्तरसुची - 2017

प्रश्न क्र. पर्याय क्र. व गुण

| | 1 | 2 | 3 | 4 |
|---|---|---|---|---|
| 76 | 1 | 1.5 | 2.5 | 0 |
| 77 | 1.5 | 2.5 | 0 | 1 |
| 78 | 0 | 1.5 | 2.5 | 1 |
| 79 | 1.5 | 1 | 2.5 | 0 |
| 80 | 0 | 1 | 2.5 | 1.5 |

## राज्यसेवा पूर्व परीक्षा - 2016

### उत्तरसुची - 2016

प्रश्न क्र. पर्याय क्र. व गुण

| | 1 | 2 | 3 | 4 |
|---|---|---|---|---|
| 76 | 0 | 1 | 1.5 | 2.5 |
| 77 | 0 | 2.5 | 1 | 1.5 |
| 78 | 0 | 1 | 1.5 | 2.5 |
| 79 | 2.5 | 1 | 1.5 | 0 |
| 80 | 0 | 2.5 | 1.5 | 1 |

## राज्यसेवा पूर्व परीक्षा - 2015

### उत्तरसुची - 2015

प्रश्न क्र. पर्याय क्र. व गुण

| | 1 | 2 | 3 | 4 |
|---|---|---|---|---|
| 76 | 1 | 1.5 | 2.5 | 0 |
| 77 | 0 | 2.5 | 2 | 1 |
| 78 | 0 | 1.5 | 2.5 | 1 |
| 79 | 0 | 2 | 1.5 | 2.5 |
| 80 | 1 | 1.5 | 2.5 | 0 |

राजमुद्रा अॅकॅडमी, लातूर

## राज्यसेवा पूर्व परीक्षा - 2014

### उत्तरसुची- 2014

प्रश्न क्र. पर्याय क्र. व गुण

| | 1 | 2 | 3 | 4 |
|---|---|---|---|---|
| 76 | 0 | 2 | 1 | 2.5 |
| 77 | 2 | 1.5 | 2.5 | 1 |
| 78 | 2.5 | 1 | 1.5 | 0 |
| 79 | 1.5 | 1 | 2.5 | 1.5 |
| 80 | 2.5 | 2 | 1.5 | 0 |

## राज्यसेवा पूर्व परीक्षा - 2013

### उत्तरसुची - 2013

प्रश्न क्र. पर्याय क्र. व गुण

| | 1 | 2 | 3 | 4 |
|---|---|---|---|---|
| 74 | 1.5 | 2.5 | 1 | 0 |
| 75 | 2.5 | 2 | 1.5 | 0 |
| 76 | 1.5 | 0 | 1 | 2.5 |
| 77 | 1 | 2.5 | 1.5 | 0 |
| 78 | 2.5 | 2 | 1.5 | 0 |
| 79 | 2.5 | 1 | 0 | 1.5 |
| 80 | 0 | 1 | 2.5 | 1.5 |